व्यावहारिकांजवळ व्यावहारिक भाषेंतच युक्तिवाद करावा लागतो.

हे हनुमंता ! या व्यावहारिक दृष्टीनें विचार करितां माझ्या असें मनांत येते कीं, जेथें सारा जगव्यवहार हाच तत्त्वत: भ्रम आहे, तेथें उपासना हा भ्रम आहे या आक्षेपांत कांहींच स्वारस्य नाहीं. तो बुद्धिपुरस्सर अंगिकारलेला असतो, हें त्या भ्रमांतील आणखी वैगुण्य नसून तें भ्रमाचा सदुपयोग करून घेण्याचें एक तंत्र आहे. आतां दुसऱ्या आक्षेपाचें उत्तर असें कीं, बुद्धिबळाचा डाव अगदीं रंगात आला असतां एकाद्या अजाण अर्भकानें किंवा धटिंगणानें तो उडवून दिला, तर त्याला त्या खेळांतील राजा, फर्जी आणि इतर मोहरीं काय करणार ! जे त्या खेळाचे जाणते आहेत, तेच त्या खेळांतील निरनिराळ्या पेचप्रसंगीं मोहरीं कशी पराक्रमी ठरतात, ते जाणतात. खेळाचे अजाणत्यांस ते न कळलें तर तें त्यांचे अज्ञान आहे.

भावजगतांतील उपासनेचा खेळ ज्यांस कळत नाहीं, त्यांनीं उपासकांचे खेळाकडे लक्ष ठेवून तो त्यांच्या संगतीनें व अनुकरणानें हळूहळू समजून घ्यावा, म्हणजे त्यांहि खेळांतील मोहरीं कशी शक्तिसंपन्न असतात, तें त्यांस कळून येईल, व ती मोहरीं त्यांच्या हातीं, श्रीरामकृष्णपरमहंसांच्या रघुवीरमूर्तीप्रमाणें खेळूंहि लागतील. दृष्टांताच्या भाषेंत बोलावयाचें तर बुद्धिबळाच्या खेळावाचून अनभिज्ञाचें कांहीं अडलें नाहीं, ह्या तिसऱ्या आक्षेपांतहि कांहींच स्वारस्य नाहीं. दिव्य व प्रभावी संस्कृतीवांचून पशूंचें कांहीं अडलें नाहीं, असें म्हणण्याप्रमाणेंच हा आक्षेप आहे. कोणतेतरी खेळ खेळावयाचेच तर बुद्धिवानांनीं बुद्धिबळाचा खेळ खेळून पहावा. त्यांत बुद्धिची पारख होते. आतां चवथा आक्षेपहि नावडतीचें मीठ अळणी अशाच स्वरूपाचा आहे. डॉक्टरांच्या घरींहि माणसें आजारी पडतात व मरतात म्हणून त्यांचीं औषधें घेण्याचें कोणीच सोडत नाहीं. मग दैवी उपायांबद्दलच हा आक्षेप घेणें हें अगदींच असंयुक्तिक आहे. सरकारचे कांहीं अधिकारी प्रसन्न झाले तर कांहीं कामें आपल्या अधिकारांत करूं शकतात. पण नेहमींच त्यांना तसें करतां येत नाहीं. ठरीव राज्यतंत्र म्हणून कांहींएक असतें व तें सांभाळावेंच लागतें. तसेंच ईशनियतीचें आहे. श्रीकृष्ण-शक्ति द्रौपदीचे वस्त्रहरणाचे प्रसंगीं व दुर्वासाने घेतलेल्या सत्वपरीक्षेच्या वेळीं कामास आली, पण ती पांडवांचा वनवास टाळूं शकली नाहीं. तूं सीताशुद्धि केलीस, पण राम-रावणयुद्ध व सीतेचें अग्निदिव्य हे प्रसंग तुलाहि टाळतां आले नाहींत. देवतासामर्थ्य व ईशनियती यांचें हे गूढरहस्य ज्यांस आकलन होत नाहीं, ते उपासनेच्या फलश्रुतीबद्दल सदा साशंक राहातात.

**उपपत्ति** – हे हनुमंता ! तुझी पूजा म्हणजे चैतन्ययुक्त प्रकृतीचेंच पूजन होय. सृष्टीची उत्पत्ति ईशाच्या संकल्पानें होते. त्याचप्रमाणें देवतांचीहि उत्पत्ति होत असावी, हें उघड दिसतें. जो राजा राजधानी वसवितो तो त्यांत अधिकारीहि नेमतो. याप्रमाणें या पिंडब्रह्मांडांतील अनेक केंद्रांत निरनिराळीं सूत्रें चालविणाऱ्या निरनिराळ्या देवता आहेत. या निरनिराळ्या अनेक देवतांची जी उपासना, ती अगावबद्ध उपासना होय व ज्यांत साऱ्या जगाचा चालक एकच ईश्वर मानून त्याच्या प्रतीकाची उपासना करतात ती एकेश्वरी उपासना होय. नाटकाचा सूत्रधार नाटकांतील अनेक देखावे रंगवितो, तसे नटहि सजवितो, व कधीं-कधीं स्वत:हि नट बनतो, किंवा सूत्रधार म्हणूनहि रंगभूमीवर येतो. या अवतारवादांतहि प्रतिमापूजेचें मूळ सांपडतें.

हे मारुते ! प्राचीन काळीं दिवंगत होऊन गेलेले दशरथ आणि राम त्यानंतर हजारों वर्षांनंतरच्या रामराज्य-वियोग नाटकांत नटरूपांत दिसतात. तो त्यांचा वेष मानवी सूत्रधाराच्या इच्छेवर, तसाच प्रेक्षकांच्या आवडीवरहि अवलंबून असतो. याप्रमाणें युगायुगाचे ठिकाणीं ईशनियतिप्रमाणें प्रगट होणारे युगधारी पुरुष निरनिराळ्या प्रतीकांची उपासना रूढ करतात.

**देवा हातीं रूप धरविला आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥** असें प्रभावशाली संत छातीठोक सांगतात. त्याप्रमाणें ज्या निरनिराळ्या प्रतीकांच्या व मूर्तींच्या रूपांत सगुणोपासना रूढ झाली आहे, त्या त्या ठिकाणीं निष्ठापूर्ण उपासनेनें देवता जागृत होतात. ईश्वराच्या प्रभावी संकल्पबलानें अवतारणारें जे देवांचे नरनिराळे विग्रह, त्यांतच अर्चावताराचाहि समावेश करतां येईल. योग्यांस साक्षात्कृत झालेल्या देवतेच्या रूपाप्रमाणें शिल्पकार मूर्ति घडवितात व त्यांची सिद्धपुरुष प्राणप्रतिष्ठा करतात.

पण हे परोक्षप्रिय देवा ! राजाचे अधिकारी व रंगभूमीवरील नट यांचें मूळ व्यावहारिक रूप ओळखणें जसें सुलभ असतें, तशी अवतारी पुरुषांची व देवतांच्या मूर्तींची अलौकिक सत्ता ओळखणें सोपें नसतें. ''कृष्णस्तुभगवान्स्वयम्'' हें रहस्य साक्षात् कृष्णचरित्र पाहाणारांनींहि क्वचितच ओळखलें असेल. तुझा अतुल पराक्रम ज्यांनीं आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिला, त्यांपैकीं कितीकांनीं तुला भूदेव म्हणून पूजलें असेल ! ही तुमची माया लक्षांत घेतली म्हणजे उपासकांचे ठिकाणीं अवतारी पुरुषासंबंधी व त्याहिपेक्षां त्यांच्या मूर्तीसंबंधीं देवताबुद्धि किती तीव्रतेनें जागृत पाहिजे, त्याची कल्पना येते. तसेंच दिव्यदर्शनांत द्रष्ट्याची शक्ति व दृश्याची शक्ति यांपैकीं उद्बोधक कोण ? एक का दोन्ही ? व दोन्ही असल्यास जास्त प्रभावी कोण ? हा प्रश्न उभा राहतो. तथापि, असें वाटतें कीं सामान्य स्तंभांतून नरहरीस प्रगट करणाऱ्या प्रल्हादाची परम उत्कट भावना फार दुर्लभ असली, तरी जेथें सहस्त्रावधी सत्पुरुषांनीं देवताबुद्धि ठेवलेली असते व देवता साक्षात्कृत केलेली असते, तेथील थोरांची सगुण निष्ठा व उपासनाशास्त्रासंबंधीं शास्त्रनिष्ठा यांच्या योगानें भाविकांची सगुण भावना त्यांच्यापुरती फलद्रूप होण्यास पुष्कळच मदत होते व तसाच भाविकांचा अनुभव दिसतो.

हे मारुते ! अनेक धर्मांतील अनेक देवदेवतांच्या विलक्षण मूर्ति व त्यांचीं त्याहून विलक्षण प्रतीकें यांच्या उपपत्तीचा विचार करतां असें दिसतें कीं –

ईश्वराच्या विग्रहाप्रमाणें, संकल्पाप्रमाणें,

तसेंच सिद्ध-भक्तांच्या भावनांनुरूप यांचें रूप सिद्ध होतें. (१) देवता पुरुष कीं स्त्री ? (२) तिचे हात किती ? (३) हातांत आयुधें कोणतीं ? (४) देवतेचें वाहन कोणतें ? (५) देवतेची सेना कोणती ? हीं अंगें भक्ताच्या भावनेत कोणी मुख्य मानतात, व त्या भावनेनुसार देवता भक्तास प्रत्यक्ष होते, असें शास्त्र सांगतें व उपासकांचे अनुभवहि तेंच सिद्ध करतात. मुख एक उपास्यदेव व त्याचे सभोंवार इतर उपदेव, मुख्य एक देव व त्याचे सभोंवतीं इतर आवरणदेवता, अशीहि अंगांगी प्रतीकोपासना रूढ दिसते. याप्रमाणें हे हनुमंता ! तुला कोणी अनेक मुखें व अनेक हस्त कल्पितात तर दुसरें कोणी तुझ्या उपासनेंत नलनलादि उपदेवताहि पूजतात. मुख्य उपास्याच्या ठिकाणीं कारण ब्रह्मभावना करतात.

हे उपास्यदेवा ! तुम्हां देवतांच्या मूर्ति आणि प्रतीकें यांचें प्राचीन निदानशास्त्र लुप्त झालें आहे, व आमची चिकित्सक बुद्धि व्यस्त प्रमाणांत वाढत आहे. वाटेल त्यानें वाटेल तें देवतेचें रूप अगर प्रतीक कल्पावें, ही गोष्ट शास्त्रसंमत होईल, असें वाटत नाहीं. कारण आजच्या बुद्धिस्वातंत्र्याच्या काळांत कोणी आपल्या स्वतंत्र बुद्धिने देवतेचे रूप अगर प्रतीक कल्पिलें तर तें सनातन कर्मविपाकशास्त्र काय म्हणून मान्य करील ? कारण तसें होऊं लागलें तर व्यक्ति तितकीं प्रतीकें होऊन त्यांचे फलादेश सांगणे शास्त्रासहि अशक्य होईल. देवतारूप व देवतेचें प्रतीक ठरविणें हें जर उपासकांचे इच्छेवर राहिले, तर त्या त्या देवतेचें पूजाविधानहि त्याच्याच इच्छेवर ठेवावें लागेल. असें झाल्यास शास्त्रास शास्त्रत्त्वच रहाणार नाहीं. मी माझ्या इच्छेप्रमाणें तुझें प्रतीक व त्याचे पूजाप्रकार ठरविले, तर त्या माझ्या अशास्त्रीय व स्वैरउपासनाबलानें तूं त्याच्या रूपांत दर्शन देण्यास अथवा त्या उपासनेचें फल देण्यास थोडाच बांधलेला आहेस ! शास्त्रनिष्ठांची अशी विचारसरणी दिसते. प्राणप्रतिष्ठेचे सिद्ध मंत्र सोडून मी जर मनःकल्पित शब्दरचना केली, तर त्या माझ्या वाक्यरचनेंत सिद्ध संकल्पशक्ति कोठून येईल ? वाक्-सिद्धि अथवा मंत्रसिद्धि ही गोष्ट जर इतकी साधी असती, तर त्यासाठीं सिद्धपुरुषांची व शास्त्राची गरजच नसती. ही सिद्धि कोणासहि सहज स्वेच्छेनें प्राप्त होणारी असती, तरमग दुःख, दारिद्र्य आणि अपयश जगांत कां वाढलें ? या सर्व कारणांस्तव तुझीं शास्त्रोक्त रूपें व प्रतीकेंच अवलंबणें भाग झालें आहे. पण विष्णूचे ध्यानास शालिग्रामच कां घ्यावा ? व नर्मदेंतील पाषाणाचें ठिकाणींच गणपतीची धारणा का करावी ? अशाप्रकारचे अनेक तर्क चिकित्सकांचे मनांत उद्भवतात व उपपत्तीसाठीं तो अडून बसतो, निदान उपासना-प्रवृत्त होत नाहीं, असेंहि कोठें घडत असेल.

हे बुद्धिश्रेष्ठा ! चिकित्सकाला असें वाटतें कीं, प्रतीक हा काय तुच्छ व जड पदार्थ आहे ! त्यांस शक्तिसंपन्न कसा मानावा ? जडाच्या ठिकाणीं बळेंच देवताभ्रम उत्पन्न करून त्यांतून कार्यनिष्पत्ति कशी होईल ? बर्फासारख्या थंड पाण्यास अग्नीची आंच लावली तर तें आपला पाणीपणा न सोडतां विस्तवासारखें भाजतें, हा साधा अनुभव सर्वांस आहे. पण सिद्धमंत्रानें प्रतीकाचे ठिकाणीं प्रतीकाचें जडत्त्व न जातांही असें शक्तिसंपन्नत्त्व येतें, हें त्यास अदृष्ट असल्यामुळें, त्याचा त्यावर भरंवसा बसत नाहीं. राजा आपला मनांतला हुकूम कागदावर लिहितो, तेव्हां तो कागद राजाची सत्ता मिरवितांना दिसतो. मग तुझी शक्तिसंपन्न मूर्ति आम्ही मनांत आणून त्याच अत्युत्कट भावनेची स्थापना बाहेरच्या प्रतीकावर केली, तर खास आपणच केलेल्या या कृतीचा आपणांसच बेभरंवसा वाटावा, हें आम्हां आधुनिकांचे ठिकाणीं निष्ठाहीनतेचें मोठेंच व्यंग आहे.

**नवीन प्रतीकें** – हे मारुते ! ही अडचण अंशतः दूर व्हावी म्हणून ज्यांची उपपत्ति तुझ्या जन्मकर्मांशी व गुणधर्मांशी कांहींशी जुळवितां येईल, अशीं बुद्धिगम्य नवीं प्रतीकें मी योजलीं, तर चिकित्साप्रवण साधकांची अडचण जाणून त्यांत तूं प्रवेश करशील काय ! हे हनुमंता ! मी हें जाणतों कीं, गाईच्या सडांतूनच दूध मिळतें, गवळ्याच्या इच्छेनुरूप तिच्या शिंगांतून किंवा शेपटींतून दूध निघणार नाहीं. तसेंच हेंहि मी विसरत नाहीं कीं, राजा कारणपरत्त्वें त्याच्या शय्यामंदिरांत, स्नानगृहांत किंवा पायखान्यांतहि जात असला, तरी त्याला भेटण्याचें ठिकाण त्याचा दिवाणखाना हेंच होय. त्याप्रमाणें ईश्वर सर्वत्र व्याप्त असला, तरी त्याचा लाभ अमुकच प्रतीकांत व्हावा, असा शास्त्रनिर्बंध घालण्यास तो मुखत्यारच आहे. पण असें असलें तरी, ज्यांस ईश्वराची विभूति असेंच म्हणावें लागेल, अशी प्रतीकरूप आसनें निवडल्यास त्यावर तुला आपल्या विशेष सत्तेने अधिष्ठित होण्यास काय हरकत आहे ?

शांडिल्यादि विद्यांच्या दृष्टीनें अनेक विद्यांचे एकीकरण करून समस्तोपासना करणें अशक्य मानलें आहे. अहंग्रहविद्येंतहि तसेंच मानलें आहे. पण कामनिकास अनेक प्रतीकांच्या समुचयानें विहितच मानल्या आहेत. अदृष्टद्वारा फलाचें निमित्त होणाऱ्या या उपासना आपल्या इच्छेप्रमाणें, समुचयानें अथवा विकल्पानेंहि करतां येतात, असें नव्हे काय ?

हे मारुते ! तुझे जन्म, कर्म, नाम, रूप, हें प्रसिद्ध असलें, तरी तुझ्या जन्मासंबंधीं प्राचीन देशकालादि अदृश्य व सुदूर आहेत. ते भूतार्थ आहेत. तुझें वर्तमानकालीन चिरंजीव व्यक्तित्व कोठें आकाशांत अगर वायुतत्त्वांत असलें, तरी तेहि सूक्ष्म व अज्ञात आहे. यास्तव चंद्रहासानें श्रीहरीस शालिग्रामांत, व मार्कंडेयानें श्रीहरास लिंगांत पाहिलें, त्याप्रमाणें खगोलपिण्ड, देहपिण्ड, अग्नि, प्राण, शब्द, मन, बल अशा ईश-विभूतिचें ठिकाणीं मी तुज मध्यस्थास पाहण्याचा प्रयत्न करीत आहें, तो तुला कितपत संमत होईल ? हा माझा तुला प्रश्न आहे. तंत्रशास्त्रानें उपासकांचे अधिकारभेदाप्रमाणें दिव्य, वीर आणि पशू असे तीन वर्ण केलें आहेत; आणि पूर्वाचार्यांनीं सौर, शैव, शाक्त, गाणपत्य आणि वैष्णव अशा संप्रदाय-भेदानें पंचोपासना रूढ केल्या आहेत. उपासनेच्या आलंबनाच्या ठिकाणीं विशिष्ट देहांचे आकार अथवा सौंदर्यच लागतें असें नसून, ईश्वराच्या दिव्यशक्तीचें संकेतच लागत असतात. यास्तव उपासकांच्या अधिकारभेदांनीं व रुचिभेदांनीं या

विभूतिमत् पदार्थांचे ठिकाणी तुझी धारणा करण्यास काय हरकत आहे ?

हे हनुमंता ! सुबोध आणि सांकेतिक भाषा, साधे अंकगणित आणि बीजगणित, यांत जे अंतर आहे, तेंच देवतांच्या मूर्ति आणि प्रतीकें यांत असावें असें वाटतें. मुरलीधराच्या सुंदर मूर्तीकडे पाहून गोपालकृष्णाच्या रासक्रीडा मनांत सहज खेळूं लागतील, द्रोणागिरी एका हातावर झेलून उभी असलेली तुझी प्रतापमूर्ति पाहून रामायणांतील एक कथाप्रसंग चटकन् ध्यानांत येईल, ही उपासकाला एकप्रकारची मदतच होईल. पण या स्थूलदृष्टीच्या संचारांत जशी सुलभता आहे, त्याचप्रमाणें कोणत्याहि कथाभागाचें स्मरण करू न देणान्या प्रतीकावर देवताविषयक किंवा ब्रह्मविषयक एकाग्र दृष्टि करण्यांत मनाची निरुपाधिक सूक्ष्मता व निर्विकल्पता वाढण्याचा जास्त संभव नाही काय ? सद्गुरुंच्या प्रवचनांत शक्तिपात असतो. तशीच त्यांच्या मौनांत त्याहून अधिक सूक्ष्मदर्शी अशी जादू असते. अशा कांहीं धोरणानें पंचप्रतीकांच्या उपासकांनीं आपआपली अरूप प्रतीकें ठरविलीं. पण मी तुझ्या चिंतनासाठीं जीं प्रतीकें निवडलीं आहेत, तीं अरूप असली तरी सूचक आहेत.

हे मारुते ! तूं आणि भीम असे दोघेहि वायुसुत असून जगजेठी म्हणून प्रसिद्ध आहांत. पण भीमाला कोणी देवता मानीत नाहींत. कृपाचार्य आणि बिभीषण हे तुझ्याप्रमाणेंच चिरंजीव आहेत, पण त्या वीरांस कोणी देवता मानीत नाहींत. तुझ्याप्रमाणें ते स्मृतिगामी नाहींत. इतर ऐतिहासिक पुरुषांच्या तसबिरींहून त्यांच्या तसबिरींचें फारसे जास्त महत्त्व नाहीं. तात्पर्य, भीम-घटोत्कचांप्रमाणें तूं केवळ मल्ल नाहींस, बलि-बिभीषणांप्रमाणें तूं केवळ दीर्घायु नाहींस, नल-नीलांप्रमाणें तूं केवळ पराक्रमी वानर नाहींस, गुह आणि शबरी यांप्रमाणें तूं केवळ रामभक्त नाहींस, जीवाला आत्मारामाची भेट करून देणारा तूं महामध्यस्थ देव आहेस, ही गोष्ट दासमारुति आणि प्रतापमारुति या तुझ्या प्रसिद्ध मूर्तींपेक्षां कोणतें एक अधिक सुलभतेनें प्रतीतीस आणून देईल ? चिकित्सक कल्पकांस कोणती प्रतीकें हा तुझा मध्यस्थ भाव पटवतील ? या दृष्टीनें मी तुझी निरनिराळी प्रतीकें योजून पाहाणार आहें. त्याला तुझी संमति आहे काय ?

**अर्धवट वेदान्त :** हे हनुमंता ! कोणी शाब्दिक वेदान्ती म्हणतात कीं, सर्वत्र रामरूपच कोंदलेलें असल्यामुळें कोणी कशानें कोणाची पूजा करावयाची ? पण खरोखर ''सर्वत्र रामरूप कोंदलेलें'' हे शब्द त्या पंडितांच्या बाडांत लिहिलेले असतात व ते शब्द ते तोंडानें उच्चारतात इतकेंच. त्यांचा प्रत्यय त्यांना असतोच असें नाहीं. ह्यामुळें शब्दपंडितांचा हा अर्धवट वेदान्त उद्धारक न होतां कधीं कधीं अधःपात मात्र करतो !

उन्हाळ्याचे दिवसांत हवा सर्वत्र कोंदलेलीच असते. पण ''आज वारा नाहीं ! वारा नाहीं ! वारा पाहिजे,'' असें जो तो म्हणतच असतो. तात्पर्य, सामान्य वान्याचा अभाव नसतांहि विशेष वारा हवासा वाटतो व त्यासाठीं पंखा घेऊन विशेष वारा निर्माण करावा लागतो, त्याचप्रमाणें सबाह्याभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलेलें असलें, तरी सगुणेश्वराच्या विशेष उपलब्धीची साधकास गरज भासते. साधकाच्या पौरुषयत्नास ब्रह्मसत्तेचा सामान्य आधार पुरेसा होत नाहीं. त्यास सगुणेश्वराचें व्यक्तबळ लागतें. निवृत्तिक अनुभवासाठीं वृत्तिज्ञानाची गरज असते.

हे हनुमंता ! कोणी मानभावी वेदान्ती असें म्हणतांना आढळतात कीं, आपलें काय आहे, तर तें आपण देवास द्यावें ? सारेंच देवाचें, तेथें देवाचेच देवास देऊन पूजा करूं पाहाणें, हा दंभ आणि व्यर्थ खटाटोपच नव्हे काय ? पण हे मारुते ! अशा लोकांचें घरदार, पैसाअडका, बायको-मुलें हीं कोणाचीं ? असें विचारलें तर तीं देवाचीं असें नुसतें म्हणण्याचेंहि अवधान त्यांना रहात नाहीं. मग तशी निष्ठा कोठली ! तात्पर्य, जेथें देह-अहंता आणि ममता कायम आहे, तेथें अर्धवट वेदान्तज्ञानानें सगुण देवतांची पूजा-अर्चा सोडणें, ही आत्मवंचनाच आहे. सारें देवाचें हे तर खरेंच, पण देवानें मला उपभोगण्यास जे पदार्थ दिले, ते माझे भोग्य पदार्थ मी ईश्वरास देणें, यात माझा त्याग आणि निर्लोभ सहज सिद्ध होतात. भगवद्रूप अतिथीस कोणी आपली प्रिय बायको, कोणी आपलें लाडकें मूल, तर कोणी आपला देहहि अर्पण केल्याच्या कथा पुराणांतरी आढळतात, त्यांतील रहस्य हेंच दिसतें.

हे हनुमंता ! साक्षात्कारासंबंधीं सारेच साधक स्वभावतः उत्सुक असतात. साक्षात्कार न होईल तर साधनमार्गांत निरंतर मन रमणें शक्य वाटत नाहीं. साक्षात्कारांत निर्गुण आत्मसाक्षात्कार हा कोणास अगदींच घरचा व स्वाधीनचा वाटतो. इदंतेनें आपल्या आत्म्याचें आपल्याला अस्पष्ट भानहि असतें. आत्मसाक्षात्कार हेंच वेदान्तशास्त्राचें अंतिम ध्येय आहे. त्यानंतर मिळवावयाचें कांहींच रहात नाहीं. हें सर्व खरें असलें, तरी आमच्या बहिर्मुख इंद्रियांस व मनास अंतर्मुख करून एकाग्र करणें ही गोष्ट सांधणें अत्यंत दुरापास्तच आहे. उलटपक्षीं निर्गुण आत्म्याचें साक्षात् वर्णन संभवत नसल्यामुळें त्यांत कौतुकास्पद, आदरणीय व आकर्षक असें जें कांहीं आहे, ते जाणवत नाहीं. त्यापेक्षां तुझें स्वरूपगुण-वर्णन जास्त कौतुकास्पद, आदरणीय व लोभणीय वाटतें. आणि यामुळें तुझ्या सगुणरूपाचा साक्षात्कार व्हावा, ही आवड आत्मसाक्षात्कारापेक्षांहि अधिक वाटते ! संतांच्या अभंगांतूनहि आत्मस्थितिभावापेक्षां सगुणरूपाच्या साक्षात्कारासाठींच मन जास्त लालचावलेलें दिसून येतें. या सगुणसाक्षात्कारासाठीं बाह्य आलंबनावर ध्यानधारणा अवश्यच आहे.

पण, हे मारुते ! कांहीं अर्धवट वेदान्ती व्यवहारांतहि सारेच मिथ्या म्हणतात; म्हणून त्यांच्या दृष्टीनें सगुणोपासना हा भ्रमच ठरतो. पण सारेंच मिथ्या असेल तर भ्रम वाटतो तोहि मिथ्याच. उलट, मी आणि माझें हें खरें मानून त्या शाब्दिक वेदान्त्यांचा रोजचा व्यवहार जर यथास्थित चालतो, तर देवपूजा तेवढींच मिथ्या मानणें हें केवढें ढोंग

आहे! आर्यसंस्कृतींतील आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, ज्योतिष हीं शास्त्रें जर व्यावहारिकदृष्ट्या मिथ्या नाहींत, तरमग देवतांचे उपासनाशास्त्र मात्र मिथ्या कसें ?

कोणीकोणी पुराणादि शास्त्रांना रूपकें मानतात. पण तें आजारी पडलें, तर त्या आजारावर, आयुर्वेदांत सांगितलेलीं औषधेंहीं रूपकें म्हणून घेण्याचें सोडीत नाहींत. खरोखर, त्यांच्या हें लक्षांत यावयास पाहिजे कीं, व्यवहारांत सारेंच रूपक आणि सारेंच मिथ्या मानलें तर आजपर्यंतचें अनेक अनुभवी विद्वानांचे सगुणोपासने-वरील ग्रंथसंभार व त्यांचे दिव्य अनुभव, हे सारेच व्यर्थ ठरतील.

## उपासनेंतील विकल्प

हे हनुमंता! तुझ्या उपासनेचे जे प्रकार शास्त्रांत सांगितले आहेत, त्यांत उपासकांचें उपास्य-इष्टदेव-कारणब्रह्म-तुलाच मानलें असून तुझ्या निरनिराळ्या शक्ति, ह्या तुझी अनेक मुखें, आयुधें व नलनलादि आवरण देवता, यांच्या रूपांत वर्णिल्या आहेत. कोठें कोठें तुझ्याठिकाणीं सूर्याची धारणाहि सांगितली आहे. अशा उपासनेंत सर्व उपांगांचा अथवा शक्तिंचा समुच्चयरूप तूं अशीच तुझी समस्तोपासना अभिप्रेत असावी असें वाटतें. मग त्यांतहि तूं म्हणजे मारुति वानर नसून तूं म्हणजे सूर्य, हा भावनेंतील एक उत्कर्ष असावा. ह्याप्रकारें तुझी उपासना जे कामनेनें करतील त्यांची कामना पुरी होईल, आणि जे निष्काम करतील त्यांचे चित्त शुद्ध होऊन तूं त्यांना यथाक्रम ज्ञानमार्गास लावशील, असें शास्त्ररहस्य उघड दिसतें.

हे हनुमंता! याप्रमाणें तूंच ज्यांचें सर्वस्व आहेस, अशा सकाम अगर निष्काम उपासकांकरिता तुझें उपासनाशास्त्र प्रवृत्त झालें आहे, तें ठीकच आहे. परंतु माझें इष्टदैवत शिव आहे. माझे सांप्रदायिक गुरु श्रीमद्‌शंकराचार्य आहेत. माझे इहजन्मींचे सद्गुरू दिवंगत आहेत. ह्या मध्यस्थ सद्गुरुंच्या ठिकाणीं मी तुझी धारणा करीत आहें व सद्गुरुरूप जो तूं त्या तुझें दैवत श्रीराम आहे, अशा स्थितींत मीं कोणाची कशी उपासना करावी ? म्हणजे कोणत्या मूर्तींची कशी ध्यान-धारणा करावी ? हा प्रश्न तुझ्या उपासनाग्रंथांतून व तंत्रांतून सुटण्यासारखा नाहीं. यास याज्ञिकाची अंगावबद्ध उपासनाहि म्हणवत नाहीं. श्री ज्ञानदेव, नामदेव व एकनाथ, या संतांचे इष्टदैवत वेगळें, त्यांचे सद्गुरु वेगळे, व त्या सद्गुरुंचे दैवत वेगळें असा कांहींसा संदिग्ध प्रकार आढळतो. श्री समर्थ रामदास व श्री तुकाराम या संतांचे वर्ग आणखी वेगवेगळे आहेत. तूं आणि कोदंडधारी राम यासंबंधी समर्थांची धारणा कोणती होती ? तसेंच बाबाजी चैतन्य व पंढरीनाथ यांच्याबद्दल तुकोबांची धारणा कोणती होती ? ह्या गूढ रहस्याचा, देवतांचा उपाधीच्या दृष्टीनें व्हावा तसा स्पष्ट बोध होत नाहीं. वस्तुत: अहंग्रहोपासना हेंच उपासनेचें पर्यवसान दिसतें. पण अहंग्रहोपासना कोणी कोणास अनुलक्षून करावी ? हा प्रश्न चिंत्य आहे. एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति। हा अखेरचा अनुभवगम्य सिद्धांत उपासनेच्या व्यवहारांत उपयोगी पडत नाहीं. उलट समन्वयाची दृष्टि सगुणोपासनेंतील एकनिष्ठेला कांहींशी अडचण मात्र करते.

हे हनुमंता! आतांपर्यंत (१) ऐतिहासिकांचा अनार्य हनुमान (२) पौराणिकांचा अप्राकृत वानर (३) तुझी पाषाणमय मूर्ति (४) पदार्थाचे विराट व (५) सूक्ष्म भाव, तसेंच (६) अग्नि, (७) शब्द, (८) प्राण, (९) मन व (१०) बल हीं सूक्ष्म व सूक्ष्मतर तत्त्वें, यांवर मी ब्रह्मभावना न करितां तुझीच धारणा केली, व तुला मध्यस्थ सद्गुरुंच्या ठिकाणीं मानलें. उपासना ही कर्तृतंत्र असल्यामुळें हें मी सारें माझ्या इच्छेप्रमाणें केलें. पण या माझ्या ओंठाबाहेरील परोक्ष भावना अपरोक्षानुभूतीशीं कशा मिटवाव्या ? हा माझ्या अल्पबुद्धीस व चंचल मनास एक अतीच बिकट प्रश्न वाटतो आहे. शिवाचें, तुझें व माझ्या सद्गुरुंचें जे मला परोक्षतेनें ज्ञान आहे, तें परस्परभिन्न आहे; आणि त्या सर्वांहून मी भिन्न आहें. अशा या सोपाधिक अनेकत्वांत उपासनेनें कसा मेळ घालावा, कीं ज्यायोगें मन अंतर्मुख व एकाग्र होऊन मी अपरोक्षानुभूतिसंपन्न होईन ? कार्यरूप कुंडल-वलयांत कारणरूप सुवर्ण पाहाण्याइतकें हें सोपें नाहीं.

हे हनुमंता! एखादा प्रापंचिक मनुष्य ज्याप्रमाणें स्वत:चे रक्षण करून व आपल्या सर्व आत्मीय कौटुंबिकांचेंहि रक्षण करून सर्वांच्या सहवाससुखांत प्रपंचकैवल्याचा अनुभव घेऊं इच्छितो, किंवा त्याहीपेक्षां केवळ मंत्रमयी अथवा शक्तिमयी वैदिक देवता अथवा प्रणवादिरूप केवळ ज्ञानस्वरूप औपनिषदिक उपास्यें यांनीं जिचें मन रमत नाहीं, अशा भावनाप्रधान सगुण भक्तिच्या संसारात पंचायतन पूजेची संगति जशी आचार्यांनी लावली, त्याप्रमाणें माझीं हीं इष्टदैवतें मी भक्तिसूत्रांत अथवा विचारसूत्रांत कशी गोंवावीं कीं, ज्यायोगें माझी बुद्धि विभागली न जातां प्रेमसमन्वयाचा आनंद मला अद्वय भजनांत अनुभविण्यास मिळेल ?

हे हनुमंता! तंत्रातील परिणामकारक व सूचक यंत्र, मंत्र आणि तंत्र, पुराणांतील भाव-भक्ति-श्रद्धापोषक सगुणेश्वराच्या गोड भावना, आणि उपनिषदांतील अहंता, इदंता व ममता कमी करणारे विचार, यांच्या सुंदर मेळांत मी माझ्या वरील देवतांची आराधना कशी करावी ?

हे हनुमंता! तुम्हां परस्परांमधील भेदांत अभेद, व तुम्हीं सारीं उपास्यें व मी उपासक योहि भेदांत अभेद मीं कशारीतीनें अनुभवावा ? तें मला कळत नाहीं. ऐक्यांत प्रेम आहे, सलोख्यात सुख आहे. अद्वैतांत निर्भयता व शांति आहे. हें सर्व खरें. पण ज्याप्रमाणें आईबाप, बहीणभाऊ, बायकोमुलें, यांचे सापेक्ष भाव प्रापंचिकाला सोडतां येत नाहींत, शरीराचे निरनिराळे अवयव अथवा इंद्रियें यांचे भेद विसरणें देहधाऱ्यास जसें अव्यवहार्य ठरतें, त्याप्रमाणें माझें इष्टदेव, माझे संप्रदायगुरु, माझे सद्गुरु, त्यांचे इष्टदैवत, तूं आणि मी या सर्वांचें वैशिष्ट्य मी सगुणोपासनेंत बळेंच कसें तिरस्कृत करूं ? हा मोठाच

अडवणीचा प्रश्न झाला आहे. औपनिषदिक उपासकांनीं हें निष्ठुर आणि दुष्कर कर्म कसें साधलें, हरि जाणे !

. हे मारूते, तुझें परमभक्त श्री रामकृष्ण परमहंस ह्यांनीं सारी दैवत्यें साक्षात्कृत करून घेतलीं. ती इतकीं कीं, मुसलमानांचा महंमद पैगंबर व ख्रिस्त्यांचा येशु ख्रिस्त यांसहि त्यांनीं साक्षात्कृत केलें ! पण अखेर ते जेव्हां निर्विकल्प समाधीचा अभ्यास करूं लागले, तेव्हां त्यांच्यापुढें त्यांची अत्यंत प्रिय अशा कालीमातेची मूर्ति त्यांच्या अंतश्चक्षूंपुढें येई. ती कांहीं केल्या निरस्त होईना. अखेर जेव्हां त्यांनीं तिचा (मनोलय) खड्गाने शिरच्छेद केला, तेव्हा त्यांना निर्विकल्प समाधी साधली ! असें वर्णन त्यांच्या चरित्रांत आढळतें. पण मला हें सारेंच गूढ वाटतें.

प्रतीकांच्या ठिकाणीं अथवा उपास्य देवतेच्या ठिकाणींहि अहंग्रहोपासना संभवत नाहीं. कारण माझें उपासनेचें प्रतीक अथवा उपास्य देवता तोच मी असें सोपाधिक भेदामुळें म्हणतां येत नाहीं. उपाधींचा बाध करून अधिष्ठानांत ऐक्य पहावें, हा विचार ठीक आहे, पण तो ध्यान-धारणेच्या प्रक्रियेंत कसा योजावा, हें समजणें व साधणें बरेंच कठीण दिसतें. कारण, प्रतीक अथवा उपास्य देवता व मी यांतील ऐक्य समान ब्रह्मभावानें संपादूं पाहावें तर उपास्य-उपासक भेद नाहींसा होऊन उपासनाच संभवत नाहीं. पण अजाण अप्रबुद्धासहि **'अहंब्रह्मास्मि'** ही **अहंग्रहोपासना जर इष्टफलदायी होते व अब्रह्मरूप प्रतीकामध्यें ब्रह्मदृष्टि करावी, असें शास्त्रीय विधानहि युक्त ठरतें, तर ब्रह्मभावदृष्ट्या मी, तूं, शिव आणि सद्गुरु सारेच एकरूप आहोंत. किंबहुना माझ्या आत्म्याचाच हा विविध विधा-विलास आहे, असें मीं अप्रबुद्धानेंहि नुसतें परोक्षचिंतन करावें काय ? माझ्या आत्मरूपावर हे सारे विवर्त आहेत, असें मनास बुद्धीनें सांगत राहावयाचें काय ? आतां मला अपरोक्षानुभूतीचीच अपेक्षा होती, तर अहंब्रह्मास्मि या एकाच धारणेनें माझें काम** झालें असतें. त्यासाठीं तूं, शिव, सद्गुरु, या द्वैत प्रपंचाचा एवढा विस्तार वाढविण्याचें कांहींच कारण नव्हतें, असाहि आक्षेप संभवतो. पण त्यास मी असें उत्तर देऊं काय कीं, पूर्वप्रारब्धबलानें ज्या दैवतांशीं माझा संबंध घडून आला, त्यांच्या स्वरूपचिंतनरूप सेवेनें व कृपाप्रसादानेंच माझ्या ठिकाणीं ब्रह्मभावनेचा उदय झाला तर होण्याचा कदाचित् संभव आहे. एरवीं भगवदनुग्रहावांचून असंस्कृत मनाने 'अहंब्रह्मास्मि' ही परोक्षधारणा करणें कदाचित् व्यर्थच होईल. किंबहुना तो एक महावाक्याच्या नुसत्या जपाप्रमाणें व्यर्थ वाचेचा खेळ मात्र होईल ! श्री रामकृष्ण परमहंसाच्या मताने देहात्मबुद्धि निरस्त होईपर्यंत अहंब्रह्मास्मि ही धारणा अनर्थावह होण्याचाहि संभव आहे. तूं देव व मी तुझा दास-भक्त हीच धारणा सामान्य साधकास योग्य आहे.

हे हनुमंता ! तुला मध्यस्थ कल्पूनच उपासना करावयाची तर तूं तत्त्वत: ब्रह्मरूप आहेस, जीवदृष्टीनें शिवाचा अंश आहेस, व देहदृष्टीनें राम-दास आहेस. तेव्हां हे जे तुझे ठळक तीन भाव आहेत, यापैकीं कोणत्या भावांशीं मी तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करावा ? किंवा याप्रमाणें तुझ्याशीं करावयाच्या तादात्म्याध्यासांत अनुक्रम आहे असें समजावें ? किंवा तिन्ही दृष्टींनीं या तिन्ही धारणा मीं माझ्या तिन्ही अंशांत युगवत् साधण्याचा प्रयत्न करावा ? यासंबंधीं यथायोग्य ती प्रेरणा तुजकडून स्पष्टपणें मला कळूं दे, व तदनुरूप धारणासामर्थ्यहि तूंच मला दे.

हे वायुनंदना ! वायु हा तुझा पिण्ड आहे, त्यांत जाणीव ही ईशिता आहे. वायु आणि जाणीव यांचेच तूं, मी, शिव आणि सद्गुरु हे पर्याय आहेत. म्हणूनच या सर्वांचा मध्यस्थ तूं असें कल्पून स्फुरद्रूप-ज्ञानस्वरूप जो तूं ईश्वर त्या ठिकाणीं मी सर्व समन्वय करूं पाहात आहें. तूं जाणीवरूप आहेस, मी स्वभावरूप आहें, शिव ज्ञप्तिमात्र आहेत, आणि श्रीगुरु बोधरूप आहेत. आपआपलें नामरूप व इतर गुणोपाधि वेगळे. पण त्या सर्वांचा बाध करून आपण सर्व निजबोधरूप आहोंत, असेंच परोक्षचिंतन करीत राहाणें, शक्य झाल्यास हेंच अपरोक्षानुभूतीचें एकमेव साधन मानावें, असेंहि माझ्या मनांत येतें. पण तें साधणें न पटणें फार कठीण आहे. कांहीं असो, तुला मी साधनमारूति असें म्हणतों. तूं शिवरूप आहेस, मध्यस्थ विवेकनामक सद्गुरुरूप आहेस व जीवरूपहि आहेस. तुझ्या प्रतिमेपासून निघालेल्या बोधगंगेत मज्जन करून कृतार्थ व्हावें, अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे.

पण हे हनुमंता ! पुन्हां असें मनांत येतें कीं, ''अहं ब्रह्मास्मि'' हा जरी सत्य सिद्धांत असला, तरी क्षुधित मनुष्यांस ''मी नित्य तृप्त आहे'' हा अनुभवशून्य सिद्धांत काय होय ! कूटस्थ 'मी' अज्ञात आहे. मला माझ्या जीव 'मी'बद्दल यत्किंचितहि आदर, गौरव किंवा सुखप्रतीति वाटत नाहीं. अशा स्थितींत ''मी ब्रह्म आहें'' अशी बळेंच धारणा करण्यापेक्षां, ज्यांच्याबद्दल माझ्या मनांत विशेष आदर आहे, असें जे तूं, शिव व सद्गुरु या व्यक्ति, त्यांच्याठिकाणीं सच्चिदानंदत्वाची भावना करणें जास्त सोयीचें होणार नाहीं काय ? पण तूं सच्चिदानंदस्वरूप आहेस, अशी भावना करण्यांत मला लाभ काय ? पार्थिव तत्त्वाचा पुढें विवेक करण्यासाठी पार्थिव तत्त्वच घेण्यास सांगण्यापेक्षा कोणत्याहि पंचीकृत भूतांत सारीं अपंचीकृत तत्त्वें कशी आढळतात, हें पाहाणें जास्त उद्बोधक होईल. त्याचप्रमाणें मी जीवात्म्याच्या ठिकाणीं ब्रह्माची धारणा करण्याचा प्रयत्न करण्यास मनांस सांगण्यापेक्षा तूं, शिव आणि माझे मानेवदेहधारी सद्गुरु किंवा त्याहूनहि दिसण्यांत विराट्, सूक्ष्म, किंवा दिव्य अशा ईशविभूतींच्या द्वारा होणाऱ्या सच्चिदानंदाच्या निरनिराळ्या व्यक्तिभवनांत सत्+चित्+आनंद हीं तत्त्वें अगोदर पाहाणें व त्या पुण्यबलानें तीं तत्त्वें माझ्या ठिकाणींहि आहेत हें अनुभविण्याचा ध्यास माझ्या मनास लावणें जास्त सोयीचें होईल काय ? पण 'तत्त्वमसि' या महावाक्यांत तत् पदलक्ष्य ब्रह्मविचारच प्राधान्यानें

सांगितला असला तरी ''अहंब्रह्मास्मि'' या महावाक्यांत 'अहम्' या पदाच्या लक्ष्यार्थाला प्राधान्य दिसतें व आचार्य ''आदौब्रह्माहमस्मि'' असा चिंतनाचा अनुक्रम सांगतात. तेव्हा अहम्‌चाच अगोदर विचार करीत असतां, तूं , मी, शिव आणि सद्गुरु या माझ्याच संवित्सागरावरील उगाच भिन्नशा वाटणाऱ्या ज्ञानवीची आहेत, असें मी मनास नुसतें सांगत राहावें काय ? बुद्धीच्या बहिर्दृष्टीची गळती जोंवर पूर्णपणें थांबत नाहीं, तोंवर अंतर्वृत्तीच्या अंत:कुंभकांत ज्ञानाग्नीची ठिणगी पडून अज्ञानाचा स्फोट कसा होईल ? ''दृश्यते त्वग्रया बुद्ध्या'' असें भगवान म्हणतात. श्री समर्थ म्हणतात : **निर्गुण म्हणजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण। सकळ त्याचे अंश हें प्रमाण। प्रचीत पाहा ॥१६/९/४** पण अन्वय व व्यतिरेक या दोन्ही पद्धतींचा एकाच वेळीं अवलंब उपासनेंतील एकाग्रास अनुकूल कसा होईल ? शिवाय, दुसरें असें मनांत येते कीं एक निर्गुण राम किंवा परमशिव आणि दुसरा जगदाकार तूं किंवा सद्गुरु यापलीकडे प्रचीति पाहाणाऱ्या 'मी'ला उभें राहाण्यास जागा तरी कोठें आहे ? श्री समर्थ म्हणतात : **येक मुख्य परमेश्वरु। दुसरी प्रकृति जगदाकारु। तिसरा आपण कैंचा चोरु। आणिला मध्यें ॥** ४/९/११, दा.बो.

हे हनुमंता ! मी तुला आणखी असें विचारतों कीं, या पिण्डांतील मूलाधारचक्रापासूनच आज्ञाचक्रापर्यंतचा योग्यांचा जो मध्यम मार्ग अथवा दहरोपासनेंतील जें दहर, तेंच तुझें मध्यस्थ स्वरूप असें मानण्यास काय हरकत आहे ? तुझ्या निरनिराळ्या मुखांची भावना या मध्यम चक्रान्वित मार्गांत किंवा दहरांतहि शास्त्रानुसार संभवते. दहर हें जडभूताकाश आहे, दहर हें जीवात्मरूप आहे व दहर हे परमात्मरूपहि आहे. असेंच तुझें त्रिविधरूप आहे. दहर हें सूक्ष्म आहे. तसेंच तें ब्रह्मांडोदराहूनहि व्यापकपण आहे. मनोवेद्य अनंत ब्रह्मांडे सामावण्याइतकें ते व्यापक आहे. तें अविनाशी व चिरंजीव आहे. असेंच तुझें रूप आहे. 'अन्वेष्टव्यम्', 'विजिज्ञासितव्यम्'. असें जें दहरांतील तत्त्व ब्रह्मचर्य वृत्तीनें जाणावयाचें, असें छादोग्यश्रुति सांगते, तेंच तुझ्या अंतरींचे रामरूप होय. याप्रमाणें अंतर्मुख वृत्तीनें दहरोपासना केली असतां माझें दहर तोच तूं, तोच मी, आणि तेंच परमशिवाचें लिङ्ग होय, अशा चिंतनांत ज्ञाता आणि ज्ञेय यांचा समन्वय ज्ञानस्वरूपांत होऊन एक निजबोधरूप मात्र उरेल असें होईल काय ! मी ज्ञाता, तूं ज्ञेय, किंवा ज्यांत तूं आणि मी लीन होतात, तें ज्ञान, यांपैकीं उपासनेच्या अंतीं कोणतेहि एकच पद उरणें, हीच उपासनेची परिणति होय, नव्हे काय ?

हे हनुमंता ! परमात्मवस्तूला विषयरूपानें ज्ञेय म्हणतां येत नाहीं व म्हणून अज्ञेयहि म्हणतां येत नाहीं. ते वस्तुत: ज्ञानरूप असून अज्ञानरूप भासत राहावें हें केवढें आश्चर्य ! ध्यान, धारणा, समाधि हें सारे अज्ञानांतीलच खेळ. वितर्कसमाधींत ध्येय स्थूलरूप असतें. विचारसमाधींत तेंच सूक्ष्मरूप असतें. या समाधींत ध्याताच ध्येयांत लीन होऊन ध्येय मात्र उरतें. आनंद आणि अस्मितासमाधींत ध्याता आपल्याच ठिकाणीं ध्येयाला समरस करतो. निर्विकल्प समाधींत ध्याता-ध्येय कांहींच नसतें, उलट चित्तवृत्तिनिरोध असतो. पण या निरोधाची परिणति, **नदी उगमीं स्थिरावे। तरी सिंधुपण कां न पावे ॥** याप्रमाणे अमर्याद विस्तारांत होते. हे शास्त्रीय सिद्धांत वाचण्यास संयुक्तिक वाटतात, इतकेंच. पण पोहण्याच्या कलेचे पुस्तक हातांत घेऊन जसें पोहतां येत नाहीं, अट्टल पोहणारानें जवळ उभें राहून पोहणें शिकवावें लागतें, त्याप्रमाणें गुरुसान्निध्यावांचून हे समाधियोग साधणें सामान्य प्रापंचिकाला तरी अशक्यच वाटतें. कोंबडी अंडे जर न उबवील, तर पिलाला तें फोडून बाहेर पडणें अशक्यच होईल ! म्हणून तुझ्या कृपेच्या पाखरेची फार फार उणीव जाणवते !

ब्रह्मसाधनांत विचार हा मुख्य कल्प व उपासना अनुकल्प मानतात. यांपैकीं आरामखुर्चीवर पडून विचार करणें सोपें वाटतें. पण असामान्य पूर्वपुण्याईवांचून नुसत्या विचारानें अज्ञानाचें ढग वितळत नाहींत आणि उपासना हें तंत्र तर परस्वाधीन वाटतें.

हे हनुमंता ! ह्या नवयुगांतील श्री रामकृष्ण परमहंसांसारख्या अलौकिक सिद्धपुरुषानें बंगालच्या कांहीं उत्कट भावनाप्रधान मुलांस ध्यान-धारणेंस लावलें व त्यासाठीं आपल्या सिद्धशक्तिनें त्यांस जरूर ती एकाग्रता प्राप्त करून दिली. ही सारीच विधिघटना अपूर्व दिसते. सामान्य व्यवहारांतील विषयी पुरुषांस प्रपंचांतील जंजाळांत राहून ध्यान-धारणा साधणें कसें शक्य होईल ? प्रापंचिक पुरुषांस अगोदर एकांत लाभणेंच कठीण. क्वचित् लाभलाच तर डोळे उघडे असतां हें विचित्र जग, व डोळे मिटल्यावर अंधेर ! अथवा दुसरा एखादा विकल्प ! याहून तो विचारा काय पांहू शकेल ! तो कसचें ध्यान करणार ? समर्थ म्हणतात - **दृश्यानें रोधिली वाट। परब्रह्माची।** शिवाय कोणतेंहि दृश्य जोंवर प्रत्यक्ष आहे असें वाटतें, तोंवर ईश्वरासंबंधीं नुसतें परोक्षज्ञान काय करील ? ऑफिसांत जातांना लहान मुलांच्या अंगांवर अक्षरबोध टाकून संध्याकाळपर्यंत ''श्री गणेशा नम:'' काढून ठेव असें ओरडून बजावण्याप्रमाणेंच ह्या परोक्षज्ञानात्मक शास्त्रांच्या आज्ञा दिसतात ! लहान बालकाचा हात धरून त्याला शिकवल्यावांचून तें बालक श्री काय काढणार ? रोज श्री-ग-णे-श म्हणत राहिल्यानें श्री प्रत्यक्ष काढतां येत नाहीं.

तात्पर्य, हे सद्गुरो हनुमंता ! तूं माझ्या डोळ्यांवरून आपल्या कृपेचा हात फिरवून एकाग्र व रहस्यग्राही दृष्टी देशील तोपर्यंत निरनिराळ्या उपासना हा संकल्प-विकल्पाचा नुसता खेळ मात्र चालू होईल. ध्यान-धारणा प्रकृतिभेदानें सर्वच साधकांस साधेल असें वाटत नाहीं. त्यासाठीं दुसऱ्याहि साधनांचा विचार व्हावयास पाहिजे.


---

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## प्रकाशित फोटोंची यादी

| अनु–क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४″ x २०″ | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | – |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २″ x ३″ | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४″ x २०″ | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०″ x १४″ | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४″ x २०″ | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०″ x १४″ | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७″ x १४″ | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४″ x २०″ | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०″ x १४″ | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७″ x १०″ | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७″ x १०″ | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४″ x २०″ | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत. याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

मार्च-एप्रिल, १९९५

रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. दयालाल हि. पटेल

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सी. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. धोर्डे

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७३ अंक १२-१

मार्च-एप्रिल १९९५

संपादक
द. म. सुकथनकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक - रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# गीतेतील तत्वज्ञान व आपले आचरण

– श्री. भीमराव कुलकर्णी
अक्कलकोट, सोलापूर.

'श्रीमद्‌भगवद्‌गीता' हा ग्रंथ म्हणजे प्रत्यक्ष भगवंताने आपला मेहुणा, मित्र व शिष्य असे तिहेरी नाते असलेल्या अर्जुनास युद्धभूमीवर केलेल्या उपदेशाचे व तत्वज्ञानाचे विवेचन असलेला अतिपुरातन धर्मग्रंथ.

या उपदेशामुळेच किंकतर्व्यमूढ बनलेल्या अर्जुनाचा भ्रमनिरास होऊन, क्षत्रियाचे युद्धभूमीवरील कर्तव्य व आचरण कसे असावे व मानवजातीने आपला उद्धार करून घेण्यासाठी कसे वागले असता अर्थ, काम, मोक्ष, सायुज्य आदी मिळू शकतात याचे विवेचन यात आहे. हे सांगत असताना काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ व अहंकार या षड्रिपूंवर विजय मिळविण्यासाठी मनाची तयारी कशी करावी लागते व हे किती कठीण आहे, हे सांगून कितीही कठीण असले तरी, दृढसंकल्प, सातत्याने (अभ्यास) प्रयत्न करून व सर्वशक्तिमान, सर्वव्यापी व सर्वज्ञ अशा परमात्म्याला काया, वाचा, मनसा करून व श्रद्धायुक्त अंत:करणाने भक्ती केल्यास तो तुमची सेवा करण्यास तत्पर आहे. फक्त अहंकार सोडून, स्वत:कडे कर्तेपणा न घेता परमेश्वराचे अधिष्ठान होऊन, फलाची आशा न धरता कर्तव्य म्हणूनच केले पाहिजे. ''कर्मण्येवाधिकारस्ते, मा फलेषु कदाचन।'' असे भगवंताचे निवेदन आहे. कारण ''सर्वत्र आहे वैभव ईश्वराचे अणूमात्र नाही जीवाचे।''

गतगोष्टींचा शोक करणे व भविष्याबद्दल निष्कारण चिंता करणे सोडून प्राप्त (सध्याच्या) परिस्थितीनुसार सम्यक (विवेकपूर्वक) आचरण करून, ईश्वरावर भरवसा ठेऊन वागल्यास, मन प्रसन्न व समाधानी राहते. अशी सात्विक वृत्तीची माणसे परमेश्वरास रजोगुणी व तमोगुणी माणसांपेक्षा फार प्रिय असतात. कारण तमोगुणी माणसे ही अहंकारामुळे, मानसिक विकृती येऊन आध्यात्मिक तत्व न समजल्यामुळे परमेश्वराची व श्रद्धेची अवहेलना करतात.

म्हणून ज्ञानी माणसे अशा तमोगुणी व अहंकारी माणसांत राहूनदेखील निर्लिप्त असतात.

**''ब्रह्मण्याधाय कर्माणि
सङ्गं त्यक्त्वा करोति य: ।
लिप्यते न स पापेन,
पद्मपत्रमिवाम्भसा ॥''**

ज्याप्रमाणे, पाण्यात सतत राहूनदेखील कमळाच्या पानावर काहीही परिणाम होत नाही (चिकटत नाही), त्याप्रमाणे, पापापासून अलिप्त राहून जे सदाचरणाने वागतात, त्यांना पापाची बाधा होत नाही, असे भगवंताचे प्रतिपादन आहे.

आसुरी संपत्ती प्राप्त केल्याने सुखी व समाधानी न होता तो स्वत: तर दु:खी होतो, पण असंख्य लोकांना दु:खी करतो.

मनुष्य आपल्या सत्कर्माने व दया, शांती, क्षमा, सत्य, अहिंसा, परोपकार या दैवी संपत्तीच्या जोरावर स्वर्गप्राप्ती करून घेऊ शकतो, पण पुण्याचा साठा कमी होताच अधोगतीस सुरुवात होते. ''क्षीणे पुण्ये मर्त्य लोकं विशति'', असे भगवंताचे प्रतिपादन आहे. हे कोणत्याही काळातील अबाधित सत्य आहे.

**''आराम के हैं सब संग साथी
जब वक्त पडा तब कोई नहीं ।
मतलब के हैं लोग दुनिया में
किसी का कोई नहीं ॥''**

**''जब टिकट मिला है जाने का
डेरा मिला समशानों में
वहाँ जाने वाले लाखों थे
चलने वाले कोई नहीं ॥''**

म्हणून ज्ञानी लोक दु:खाने खचून जात नाहीत किंवा ऐहिक सुखाने हुरळून जात नाहीत. अशा लोकांना भगवद्‌गीतेत 'स्थितप्रज्ञ' असे म्हटले आहे.

मन हे अति चंचल असल्यामुळे त्याच्यावर ताबा ठेवणे हे फारच कठीण. म्हणूनच आताच्या (कली) युगातच काय, पण यापूर्वीच्या युगातदेखील भगवद्‌गीतेतील तत्वज्ञानाप्रमाणे तंतोतंत वागणे कठीणच होते. तरी अशाश्वत गोष्टींचा त्याग करून व अत्यंत दृढनिग्रहपूर्वक प्रयत्न केल्यास ते साध्य होईल, असे अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नास श्रीकृष्णांनी उत्तर दिले आहे.

**''असंशय महाबाहो**
**मनोदुर्निग्रहं चलम ।**
**अभ्यासेन तु कौंतेय**
**वैराग्येण च गृह्यते ।''**

(अर्थ : ''अर्जुना, यात मुळीच संशय नाही की, या चंचल मनाला आवरणे फारच कठीण आहे. परंतु सतत प्रयत्न करून व वैराग्याने (अशाश्वत गोष्टींचा त्याग करून) मन ताब्यात ठेवता येते.

मनुष्यस्वभाव मूळचाच अहंकारी असून देहालाच मी म्हणत असतो. त्यामुळे सदैव संयमपूर्वक जागृत राहून अहंकाररहित झाल्यास आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होते व देहाभिमान गळून पडतो व मी म्हणजे जड शरीर नसून 'मी' म्हणजे चैतन्यमय आत्मा आहे, अशी भावना उत्पन्न होते.

**नैनं छिंदन्ति शस्त्राणि,**
**वैनं दहति पावक: ।**

असे भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे आत्मा हा नाशिवंत नसून तो अमर व अविनाशी आहे.

त्यासाठी भगवंतांनी सांगितले आहे की :

**''सर्व धर्म परित्यज्य**
**मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्व पापेभ्यो**
**मोक्षयिष्यामि मा सुच ॥**

म्हणजे ''सर्व प्रकारच्या धर्माचा त्याग करून मला एकट्याला शरण ये !'' ''मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. शोक करू नकोस. भिऊ नकोस.''

**''अनन्याश्चिंतयो मां**
**ये जन: पर्युपासते**
**तेषां नित्याभियुक्तानां**
**योगक्षेमं वहाम्यहं ।**

म्हणजे, अनन्य भक्तिभावाने माझ्या दिव्य स्वरूपाचे जे चिंतन करतात त्यांना अप्राप्य असलेले मी प्राप्त करून देतो व ज्याला प्राप्ती झाली आहे त्याचे रक्षण करतो.

कोणत्याही तत्वज्ञानाचे तंतोतंत आचरण करणे सामान्य माणसांना कठीण असते. प्रथम आपली आपल्याशीच (आत्म्याशी) ओळख करून घेणे आवश्यक आहे. म्हणून ''असतो मां सद्गमय तमसो मां जोतिर्गमय'' अशी प्राचीन ऋषी-मुनींनी परमेश्वराची प्रार्थना केली आहे. इतर धर्मग्रंथांतील तत्वज्ञानाचे तंतोतंत पालन करणे सोपे असते, असे मानणे व कोणत्याही धर्मग्रंथाचे वाचन, मनन, चिंतन न करता शंका घेणे, हे अज्ञानच मानावे लागेल. म. गांधींनी आपल्या धर्माबद्दल लिहिले आहे की, ''आपल्या धर्मात (हिंदू) सर्व धर्मांतील सर्व चांगल्या गोष्टींचा समावेश आहे.'' गीतेतील तत्वज्ञान तंतोतंत आचरण्यास अवघड वाटत असले तरी, सातत्याने प्रयत्न, दृढसंकल्प व परमेश्वरावर नितांत श्रद्धा असल्यास साध्य करता येते, याची अनेक उदाहरणे देता येतील.

**''यदा यदा हि धर्मस्य**
**ग्लानिर्भवति भारत**
**परित्राणाय साधूनां,**
**विनाशाय च दुष्कृतां**
**धर्मसंस्थापनार्थाय**
**संभवामि युगे युगे ।**

ज्या ज्यावेळी धर्माचा ऱ्हास, व अधर्म वाढू लागेल, त्या त्यावेळी धर्माच्या, तत्वज्ञानाच्या पुरस्कारासाठी व संस्थापनेसाठी मीच अवतार धारण करून येतो, असे भगवंतांनी आश्वासन दिले आहे व त्याप्रमाणे जगाच्या पाठीवर अनेक अवतारी पुरुष उदयास येऊन, त्यांनी वेळोवेळी दुर्जनांचा नाश व सज्जनांचे रक्षण केले आहे. स्वामी विवेकानंदांनी अवतारी पुरुषास घाट व गाईच्या आचळांची उपमा दिली आहे. कारण नदीचे पवित्र स्नान करण्याच्या सोईसाठी घाट असतात त्याचप्रमाणे गाईचे शुद्ध दूध मिळविण्यास आचळांद्वारे पान्हा फुटावा लागतो, म्हणून आचळांचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे परमेश्वर-प्राप्तीसाठी अवतारी पुरुषच कारणीभूत होतात.

आपल्या भारतवर्षात कितीतरी अवतारी पुरुष होऊन गेले की ज्यांनी धर्माचे तत्वज्ञान तंतोतंत पाळले व इतरांकडून पालन करून घेतले.

आधुनिक युगातील अवतारी संतांत श्री ज्ञानेश्वरमाऊली, तुकाराम महाराज, रामदास स्वामी, अक्कलकोट स्वामी समर्थ, शेगावचे गजानन महाराज, महताबशा, शिरडीचे साईबाबा, इत्यादींची नावे सांगता येतील.

आध्यात्मिक तत्वांचे पालन होण्यास देश, वंश, वर्ण, लिंग, जात-जमात, इत्यादींमुळे काहीच अडचण येत नसते, फक्त अहंकाररहित निर्मळ मन, ईश्वरावर श्रद्धा व दृढसंकल्प यांची आवश्यकता असते.

मनुष्य-स्वभावात असलेल्या (देहाकार) अहंकाराबद्दल (Ego) सांगितली गेलेली खालील गोष्ट उद्बोधक आहे :

एका शहरात एक तरूण मूर्तिकार राहत असे. मूर्ती हुबेहूब करण्यात तो इतका तरबेज होता की त्याच्याइतक्या हुबेहूब मूर्ती तयार करण्यात कोणीच हात धरीत नसत. एकदा त्याला वाटले की, आपल्या कलेचे कौतुक जगाच्या कानाकोपऱ्यांत पसरावे, यासाठी आपण जास्तीत जास्त काळ जगणें आवश्यक आहे. म्हणून त्याला आपले आयुष्य किती आहे, हे जाणून घेण्याची इच्छा झाली. तो एका ख्यातनाम ज्योतिर्विशारदाकडे गेला व त्याने आपल्या आयुष्याबद्दल विचारले. ज्योतिषाने त्याच्या कुंडलीच्या आधारे सांगितले, ''येत्या शनिवारी एक व त्याच्या पुढच्या शनिवारी दुसरे, अशी दोन गंडांतरे आहेत. त्यातून तू सुटलास की मग तू ६० वर्षांच्या वर जगशील.'' मूर्तिकाराने आपल्या असीम कलेचा उपयोग करून स्वत:च्याच १० प्रतिमा हुबेहूब एकसारख्या तयार केल्या. अगदी तेच रूप, तोच रंग, तेच भाव, तेच स्मित. पहिला शनिवार आला. स्वत: मूर्तिकार व १० मूर्ती मिळून एक वर्तुळ तयार केले, जेणेकरून यमदूतालाही खरा मूर्तिकार कोण हे कळू नये. पहिल्या शनिवारी जेव्हा ठराविक वेळेस यमदूत त्याला नेण्यासाठी आला, तेव्हा तो इतका बुचकळ्यात पडला की, या अकरांपैकी खरा मूर्तिकार कोण ? चुकीच्या व्यक्तीस नेल्यास यमदेवाकडून मलाच शासन होईल, या विचाराने परत यमराजाकडे जाऊन यमदूताने वस्तुस्थिती सांगितली तेव्हा यमाने सांगितले की, मूर्तिकार किती चलाख असला तरी तो मानव आहे. अहंकार हा मानवस्वभाव आहे. तू पुढच्या शनिवारी जा व त्या मूर्तींकडे पाहून मनसोक्त स्तुती कर ! त्याप्रमाणे तो तेथे येऊन मूर्तीच्या मध्यभागी उभा राहून म्हणाला, ''आऽहाऽहा ! किती या सुंदर मूर्ती !! किती एकसारख्या हुबेहूब !!! मूर्ती इतक्या सुंदर आहेत, तर त्या घडविणारा किती सुंदर असेल ! त्याला पाहिल्यावर मला किती आनंद होईल बरे !''

असे म्हणताच मूर्तिकारातील अहंकार जागा झाला. त्याला मृत्यूचेही भान राहिले नाही. तो ओरडला, तो मीच ! यमदूताचे काम झाले व आनंदही वाटला. त्याने त्याला (मूर्तिकाराला) यमदरबारात हजर केले.

तर, असा हा अहंकार मनुष्याच्या विनाशास कारणीभूत होऊ शकतो.

म्हणूनच भगवंतांनी भगवद्गीतेत केलेला उपदेश, मोठ्या प्रेमाने व मानवजातीच्या कल्याणाच्या हेतूने केलेला आहे.

# पवित्र पर्वतीय क्षेत्र 'पावागढ'


- श्री. अशोक मोहिते
बडोदे, गुजरात.

बडोद्याहून ४६ किलोमीटर अंतरावर 'पावागढ'चा उंच डोंगर ! ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळ ! पावागढचा इतिहास 'पताई रावळ'च्या जीवनाशी गुंफलेला आहे. पावागढच्या पायथ्याशी आहे 'चंपानेर' ! असे म्हटले जाते की 'वजराज चावडा' या राजाने महामंत्री 'चंपा'ची स्मृती कायम रहावी म्हणून हे नगर वसविले. 'रावळ कुळा'चे 'पताई' कुटुंब इथेच राज्य करीत होते.

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात 'चंपानेर'च्या समृद्ध आणि बलवान राज्याचा अधिपती म्हणून चौहाण वंशाचा शूरवीर आणि प्रजावत्सल राजपूत राजा जयसिंहदेव ऊर्फ बेनीराय हा प्रजेत ज्या आदरणीय नावाने प्रसिद्ध होता तो 'पावापती' राजा पताई रावळ चंपानेरच्या राजसिंहासनावर गौरवाने आरूढ झालेला होता.

समग्र 'गुर्जर' देशाच्या छोट्या देशी राज्यांमध्ये 'चंपानेर'चे हिन्दू राज्य सर्वात समृद्ध व बलवान गणले जात होते. येथील प्रजा सुखी, समाधानी व संतोषी होती. अनेक किल्ल्यांची हारमाळ असलेल्या राजधानी 'चंपानेर'मध्ये बावन बाजार आणि चौऱ्यांशी 'चौरा' (चौक) अस्तित्वात होते. 'माळवा' व धनवान 'गुर्जर' देशाच्या सरहद्दीवरील हे पर्वतीय नगर रमणीय व व्यापाराचे मुख्य केन्द्र होते.

प्रजावत्सल राजा व राजाप्रेमी प्रजा या सर्वांची कुळदेवी 'श्री कालिका' हिच्याविषयी अपार श्रद्धा व आस्था होती. त्यामुळेच राजा व प्रजा हे सर्व सदोदित देवीच्या परमभक्तीमध्ये लीन असत. राज्याच्या परंपरेनुसार प्रतिवर्षी पवित्र 'आश्विन मासा'मध्ये 'नवरात्री'चा सण मोठ्या उत्सवाच्या स्वरूपात राजमहालाच्या पटांगणात, तसेच नगरातील 'चौरा' (चौकात) येथे साजरा केला जात असे. नऊ दिवसांपर्यंत रात्री रास, गरबा, धार्मिक नाटके, रामलीला, लोककथा, तसेच शौर्यकथा वगैरे धार्मिक कार्यक्रम



मोठ्या आस्थेने साजरे केले जात असत. या उत्सवात राजघराण्यातील लोक व नगरजन मोठ्या भक्तिभावाने भाग घेत असत. नगरातील सर्व मंदिरांमधील दीपमाळांमध्ये पणत्या तेवून रोषणाई केली जात असे.

लोकवाच्यता अशी आहे की अशाच एका नवरात्रीच्या काळरात्री 'श्री कालिकामाता' स्त्रीसुलभभावाने प्रेरित होऊन तिने मानवदेह धारण केला. ती राजमहालाच्या पटांगणामध्ये जे 'रास-गरबा' नृत्य चालले होते त्यात सामील झाली. मध्यरात्रीनंतर या नृत्याची लय वाढते. द्रुतगतीमुळे नृत्याची रंगतसुद्धा वाढते. राजदरबारातील स्त्री-वृन्द या रूपयौवनेला गरबा नृत्यामध्ये सामील झालेली बघून आश्चर्यचकित झाला. त्यावेळचे तिचे रूप-सौंदर्य चट्कन कुणाच्याही नजरेत भरेल असेच होते.

राजदरबाराच्या अंतर्गत मित्रमंडळीं-मधील कुणी एका दुष्ट, अविचारी इसमाच्या चिथावणीने राजा पताई रावळ याच्या दिलो-दिमागात कामाग्नी प्रगट झाला. त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली. आणि याच विकाराने प्रेरित होऊन त्याने रूपयौवनेचा पदर हाती धरला व तिला स्वत:च्या महालात येण्याविषयी आग्रह केला. त्यावेळी देवीने स्वत:च्या असली रूपाची त्याला ओळख दिली, पण राजा तिच्या सौंदर्यावर लुब्ध झाला होता, तो मोहान्ध बनला होता. राजाच्या मनातला कामाग्नी पेटलेला बघून देवी संतापली. तिने क्रुद्ध होऊन त्याला शाप दिला व ती अदृश्य झाली. याचा परिणाम असा झाला की देवीच्या शापामुळे चंपानेरचे समृद्ध नगर नाश पावले वगैरे....

थोड्या दिवसानंतर गुजरातमधील अहमदाबादचा बादशहा महमद बेगडा याने जयसिंहाच्या राज्यावर चढाई केली व गढ (गड) जिंकला. पताई हरला, मारला गेला. त्यावेळी काही जरूरी कारणासाठी बेगडाने राजधानीचे स्थलांतर अहमदाबादहून चंपानेरला केले होते. त्याने चंपानेरचा विकास केला. अनेक स्थापत्यांची रचना केली, भव्य वास्तुशिल्पे उभी केली. आजसुद्धा ठिकठिकाणी बघायला मिळत असलेले अवशेष चंपानेरच्या नगर-विस्ताराची व शोभासमृद्धीची साक्ष देतात. चंपानेरचा किल्ला, वहोरा मशिद, मांडवी, कीर्तिस्तंभ, शेखचे देरू वगैरे प्रेक्षणीय आहेत. किल्ल्याच्या बाहेर सुंदर कोरीव काम असलेली जुम्मा आणि केवडा मशिद आजसुद्धा स्वत:चे अस्तित्व टिकवून आहेत. चंपानेरच्या दोन किलोमीटर अंतरावर दूर वड तलावाजवळ 'बेगडा' याच्या महालाचे अवशेष उपलब्ध आहेत.

१६ व्या शतकातील महान संगीतकार 'तानसेन' याच्या समकालीन आणि प्रतिस्पर्धी 'बैजु-बावरा' हा चंपानेरचा रत्न होता. त्यावेळी येथील प्रत्येक वास्तुशिल्पामध्ये बैजु-बावराचे संगीत-सूर गुंजले होते.

पावागढ अंदाजे ८०० मीटर उंच असा पर्वत आहे. त्याच्या अत्युच्च शिखरावर 'माँ-महाकाली' देवीचे स्थान-मंदिर आहे. हे शिखर कमालीचे अरूंद आहे. मंदिरापर्यंत पोहचायला पायऱ्या आहेत. पर्वतावरील मानस सरोवर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'दुधिया' सरोवरापासून देवीच्या मंदिरापर्यंतची पर्वतीय चढण अतिशय अवघड आहे. २ रा दगडांच्या पायऱ्यांचा हा मार्ग चढून वर जावे लागते. हे कष्टप्रद चढण असूनदेखील भाविक पर्वताच्या आजूबाजूच्या नैसर्गिक व आल्हाददायक वातावरणाने प्रफुल्लित होत असतात.

प्राचीन काळी विश्वामित्र ऋषींनी या पवित्र स्थानी आद्यशक्ती जगद्जननी श्री महाकाली मातेची स्थापना केली होती, अशी दृढ मान्यता आहे आणि त्यामुळेच कदाचित सर्व शक्तिपीठांमध्ये ह्या अलौकिक स्थानाचा अग्रक्रम आहे.

पंधराव्या शतकाच्या अंतापर्यंत हे प्राचीन मंदिर हिन्दू प्रजेच्या धार्मिक आस्थेचे मुख्य केन्द्र होऊन राहिले होते. परंतु सुलतान महंमद बेगडाने १४८४ मध्ये चंपानेरचे शक्तिशाली हिन्दू राज्य जिंकून राजसत्तेवर धर्मान्ध मुस्लिमांचे अधिपत्य प्रस्थापित केले. जैन व हिन्दुमंदिरे नष्ट करण्यामागच्या त्याच्या जुलमी प्रयत्नांमुळे इतर मंदिरांसोबत या प्राचीन मंदिराचे वैभवदेखील नष्ट पावले.

श्री महाकालीचे सद्याचे हे मंदिर 'मराठा सत्ता'काळात पुन्हा स्थापित झाले, अशी इतिहासात नोंद आहे. सद्याच्या या मंदिराची बांधणी साधी आहे. या मंदिरात नित्य महाकालीच्या मुखाची प्रतिमा व यंत्र पूजिले जाते. देवीचे हे स्थान उत्तराभिमुख आहे. त्याच्या अग्रभागी त्रिशूळ व विशायंत्र स्थापन केली आहेत. देवीच्या मुख्य स्थानाच्या आजूबाजूला श्री महाकालीचे मूर्तिस्वरूप, तसेच श्री बहुचराजी माँ व श्री महालक्ष्मीदेवी विराजमान आहेत. मंदिराच्या भोवती उंच तटबंदी करून ते अधिक सुरक्षित करण्याचा प्रयत्न झाला आहे.

डोंगरावर चढताना मधोमध 'माची' हे स्थळ लागते. तिथपर्यंत एस्.टी. बससुद्धा जाऊ शकते. या स्थळी 'रावळ'च्या महालाचे अवशेष बघायला मिळतात. तिथे सर्किट हाऊस, हॉटेल्स वगैरे आहेत. इथून पुढे पायऱ्यांपर्यंत रोपवेची सोय आहे. माचीच्या पुढे 'तेलिया' तलाव लागतो, अन् तिथून वर जाता 'दुधिया' तलाव दिसतो. ही जागा विशाल आहे. तिथे काही 'विहारधाम', हॉटेल्स व दुकाने आहेत. ५५० मीटरच्या उंचीवर भद्रकालीचे मंदिर आहे. इथपर्यंत पोचण्यासाठी रोपवेची सोय आहे. त्यानंतर अरूंद, पण सरळ शिखरावर जाण्यासाठी २५० पायऱ्या चढाव्या लागतात. वर महाकालीचे मंदिर, अन् मंदिराच्या माथ्यावर 'सनदशाह पीर'ची दरगाह !

मराठा शासनकाळाच्या अंती त्यावेळी बलवान ठरलेल्या कित्येक धर्मान्ध व जुलमी मुसलमानांनी मंदिराच्या गर्भगृहावरील शिखराचा भाग पुन्हा खंडित केला व त्या जागी श्री सनदशाह नावाने गुजरातमध्ये प्रसिद्धी पावलेल्या औलिया पीराची दरगाह स्थापित केली, जे सद्याच्या काळातसुद्धा हिन्दूंच्या धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श नमुना ठरले आहे.

भारतातल्या कालीपूजेच्या तीर्थक्षेत्रांमध्ये या स्थानाचे विशेष महत्त्व आहे. गुजरातमध्ये एका बाजूला अंबाजी तर दुसऱ्या बाजूला असलेल्या या कालिकेचा महिमा अपरंपार आहे.

'पावागढ' पर्वताच्या अखेरच्या शिखरापासून जवळ श्री दिगंबर जैन धर्माची

(पृष्ठ क्र. ८ वर)

# बालसाईभक्तांसाठी बाबांची अमृतवाणी

– साईसेविका

बालसाईभक्तांनो ! साईसत्चरितातील साईंचे बोल म्हणजे अमृत आहे. तुम्हीपण बालवयापासूनच बाबांचे बोल लक्षपूर्वक वाचा, त्याचा अर्थ समजावून घ्या, आचरणात आणा. बघा, सदैव यशस्वी व्हाल, आयुष्यात तुम्हाला कशाचीही कमतरता पडणार नाही.

**''गरीबी अव्वल बादशाही । अमिरी से लाख सवाई ।''**

साईबाबा प्रथम गोरगरीब, दीनदुबळे यांचे देव आहेत. फाटके-तुटके नेसून, पाच घरी भिक्षा मागून मिळेल ती भिक्षा सर्वांना वाटायची, मग थोडीफार स्वत: खावयाची, हा त्यांचा नित्यक्रम. गरीबी अव्वल बादशाही, म्हणजे खाऊन-पिऊन सुखी असलेला, स्वकष्टाने कमाई करणारा, कोणाचा मिंधा नसलेला. गरीब असेल तर त्याच्याकडे कोणाच्याही नजरा खिळून राहणार नाहीत. आपले आपण राजे असतो. खाता-पिता, उठता-बसता, नोकर-चाकर यांच्या नजरा रोखून पाहणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या नजरबंदीत आपण राहणार नाही. धनिकाला स्वत:ची प्रतिष्ठा जेथे-तेथे सांभाळावी लागते. ती सांभाळण्यातच त्याचा सारा वेळ, आयुष्य संपते. गरीब राहा, परंतु मनाची श्रीमंती ठेवा, म्हणजे तुम्ही मनाचे बादशहा होऊन यशस्वी जीवन जगाल.

**''वादावादी नाही बरी । नको कुणाची बरोबरी ।।''**

वादामुळे सर्वनाश होतो. प्रत्येकाची कामाची ताकद वेगवेगळी असते. जर आपण दुसऱ्याची बरोबरी करू लागलो, तर कुठलेच काम नीट होणार नाही. आपल्या कुवतीप्रमाणे आपण आपले काम करावे. उठसूठ दुसऱ्याशी तुलना करू नये. जेथे जेथे वादावादीची बुद्धी आहे तेथे माया, मोह, अविद्या यांचा जोर असतो. अशी व्यक्ती अज्ञानाने ग्रासलेली असते. त्यामुळे स्वत:चा विकास ती करू शकत नाही. आज अज्ञान, अहंकार यांमुळेच रोजच्या रोज खून, मारामाऱ्या, भांडणे होत आहेत. आपण जर बाबांचे बोल काळजीपूर्वक वाचून त्यांचे चिंतन केले व आचरणात आणले तर अनेक अनर्थ टळतील.

**''श्वान, सुकर वा माशी । हडहड कुणाशी करू नये ।''**

लाग्याबांध्यावीण कोणीही आपल्यापाशी येत नसतो, मग तो मुंगी, माशीसारखा लहान प्राणी असो अथवा मांजर, कुत्रा, डुक्कर असो. हडहड करू नकोस. चांगले बोलता आले नाही, तर वाईट, अपशब्द बोलून जीभ विटाळू नकोस. पशुपक्षी, एवढेच नाही, तर पायाखालची माती, प्रत्येक वस्तू, आपल्याला भेटणारी माणसे यांचे जन्मजन्मांतरीचे नाते असते. ते नाते संपेपर्यंत ती ती माणसे अथवा संबंधित घटना घडत असतात. ती नाती जाणून घ्यावीत. प्रवासात, नोकरीत, घरी-दारी कितीतरी विरोध करणारी माणसे असतात, त्यांच्यातही साई पहावा, त्यांचे शब्द हे साईंचे शब्द म्हणून स्वीकारावे.

**''माझिये भक्तांचे धामी । अन्नवस्त्रा नाही कमी ।''**

साईबाबा आपणाला हमी देतात की माझा जो भक्त आहे त्याच्या घरी अन्न व वस्त्र ह्या भक्तांच्या आत्यंतिक गरजा त्याला कधीही कमी पडणार नाहीत. बाबांचा भक्त होणे म्हणजे तनाने, मनाने, धनाने सदैव साईंचे होणे. क्षण-न्-क्षण, सुखात-दु:खात, असेल त्या परिस्थितीत साई-स्मरण करणे, प्रत्येक गोष्ट चांगली किंवा वाईट साईंच्या इच्छेने घडली असे मनापासून वाटणे व त्याचा मन:पूर्वक स्वीकार करणे याला साईंचा होणे असे म्हणावयाचे. सतत साईंचाच विचार करणे म्हणजे साईंचा भक्त होणे. त्याचा योगक्षेम चालविण्याची जबाबदारी साई स्वत: घेत आहेत.

**''सोडूनिया लाख चतुराई । स्मरा निरंतर साई साई ।''**

साईबाबा सांगतात, तुम्ही बुद्धिवंत, ज्ञानवंत असाल, बोलण्यात हुषार असाल, तरीही नम्रपणे, अंत:करणपूर्वक ''साई साई'' असे नामस्मरण करा. साईबाबा म्हणजे स+आई व बाबा. आई इतकाच खोल अर्थ साईनामात भरला आहे. आईचे प्रेम, जिव्हाळा, आपुलकी सामावून राहिली आहे साईत. साईनाम जपत राहिल्याने भक्त व साईबाबा यांच्यात जवळीक साधली जाते, साईबंधनाचे अतूट नाते भक्तांत निर्माण होते. साईनाम जपल्याने संकटांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य मिळते. किती सोपी साईभक्ती साईबाबा आपणास करावयास सांगतात !

**''बरे नव्हे कोणाते छळणें । तेणें मजला येते दुखणें ।''**

बालसाईभक्तांनो ! तुम्हाला हट्ट करायचा व पाहिजे ती वस्तू मिळवायची सवय असते, खरे ना ! काही वेळा हट्ट करूनही पाहिजे ती वस्तू मिळाली नाही, तर तुम्ही त्रास देण्यास सुरुवात करता, कधी आईला, तर कधी घरातील सर्व माणसांना, कधी शेजारी-पाजारी, तर कधी समाजालासुद्धा त्रास देऊन आपला हट्ट पुरा

करून घेण्याची सवय लागत जाते. साईबाबा सांगतात, प्रत्येक भूतमात्रात ईश्वराचा वास आहे. तुमच्याकडून कोणालाही त्रास झाला किंवा कोणी दुखावला गेला, तर तो त्रास देवाला, म्हणजेच साईंना होतो. अगदी क्षुद्र किडा, मुंगी या प्राण्यांपासून ते महा-अजस्त्र प्राणी, पशू, पक्षी, जलचर, खेचर, मानव या सगळ्यांमध्ये जी चेतना शक्ती आहे ती शक्ती दुखवली जाते व त्यामुळे साईंना, म्हणजेच देवाला दुःख होते. तेव्हा आपल्याकडून कोणीही दुखावले जाणार नाही अशीच प्रत्येकाची वागणूक असावी, असे साई सांगतात.

**''भुकेल्या भाकर आधी द्यावी।**
**आपुल्या पोटा नंतर खावी।''**

साईबाबांची शिकवण किती साधी, सोपी व सरळ आहे, बघा. आलेल्या-गेलेल्याचा आदर कर, तहानलेल्यास पाणी दे, भुकेलेल्यास भाकरी दे, उघड्यास वस्त्र दे व घर नसलेल्यास बसावयास ओसरी दे, म्हणजे श्रीहरी तुष्ट होईल. सर्व लहान मुले प्रथम स्वतः खाऊन मग उरले तर दुसऱ्यास देतात, परंतु लहानपणापासून प्रत्येकाने स्वतःला अशी सवय लावून घ्यावी की आधी सर्वांना वाटावयाचे व उरलेले आपण खायचे. सर्वांचे मन शांत, समाधानी केल्याने त्यांचे मनापासूनचे आशीर्वाद नकळत आपणास मिळतात. श्रीकृष्ण त्यांच्या सवंगड्यांना प्रथम स्वतःच्या हाताने घास भरवी, नंतर स्वतः खात असे. साईबाबा पाच घरून भिक्षा मागून आणत, ती सर्वांना वाटत व उरलेला थोडा भाग स्वतः खात असत. तर बालमित्रांनो! तुम्हीही दुसऱ्याचा विचार आत्तापासूनच करावयास शिका, बरे का! साईंची हीच शिकवण आहे.

**''जो जो जैसे करील।**
**तो तो तैसे तैसे भरील।''**

प्रत्येकाने चांगले व प्रामाणिकपणे काम करावे, असे साईबाबा सांगतात. दुसरा खोटे बोलला, वाईट वागला, अपशब्द बोलला तरी आपण आपले सत्कर्म सोडू नये. प्रत्येक चांगल्या-वाईट कामाची नोंद परमेश्वराजवळ होत असते. आपण मनाने व कार्याने दुसऱ्याचे चांगलेच भजावे, म्हणजे आपल्याजवळही चांगलेच येते. चांगले व शुद्ध विचार आणि काम केले म्हणजेच देवाची पूजा होते. प्रत्येकजण स्वतः केलेल्या चांगल्या अथवा वाईट कर्माने जगत असतो, व त्याची चांगली किंवा वाईट फळे चाखत असतो. तेव्हा, दुसऱ्याचे कोणतेही काम त्याने कसेही केले तरी आपण आपला सरळ मार्ग सोडायचा नाही. आपल्या प्रत्येक कार्याची नोंद साईबाबांजवळ असते. त्याप्रमाणे ते आपल्या पदरात फळ देत असतात.

**''काढोनि ऋण करणे सण।**
**नावडे बाबांस कर्जबाजारीपण।''**

''उत्सवप्रियः मनुष्यः।'' माणसाला उत्सव, सण मनापासून साजरे करावयास आवडतात. जवळ पैसे नसले तर उसने पैसे घेतील, सावकाराकडून कर्ज काढतील, पण थाटामाटात कशाची कमतरता पडू न देता सण साजरा करतील. साईबाबा सांगतात, कशाला फुकटचा मोठेपणा हवा? आपण साधेपणाने, आपली ऐपत असेल त्याप्रमाणे साधे रहावे, साधे वागावे. साधेपणाने सणवार, उत्सव साजरे करावे. साधे राहा. मनाने श्रीमंत व्हा. कधीही कर्ज काढून गुलाम होऊ नका. साधी राहणी, उच्च विचारसरणी असे वागा.

तर बालमित्रांनो! श्री साईसत्चरित या प्रासादिक ग्रंथातील काही निवडक साईबाबांचे अनमोल बोल किती सुंदर, साधी, सोपी शिकवण देतात, खरे ना! तुम्ही लहान मुले खूप चांगली असता. सर्व चांगल्या गोष्टींची सवय बालपणापासून लागली तर मोठेपणी तुम्ही चांगले जीवन जगाल. म्हणून साईबाबांचे बोल लक्षपूर्वक वाचा, त्यावर मनापासून विचार करावे आचरणात आणा. त्यामुळे यशस्वी व समृद्ध जीवन तुम्ही जगाल आणि स्वतःचे व दुसऱ्यांचे भले होईल.

---

(पृष्ठ क्र. ६ वरून)

पवित्र मंदिरे आहेत. यातील तीन मंदिरे 'दुधिया' सरोवराच्या किनारी आहेत आणि दुसरी चार मंदिरे तीन टोक्याच्या नगारखान्याजवळ व बाकीचे एक मंदिर 'छाशिया' तलावाजवळ आहे.

जैन शास्त्राप्रमाणे 'पावागढ'ला सिद्धक्षेत्र अति पवित्र धाम म्हणून संबोधिले आहे.

प्रभु श्रीरामचंद्र आणि विसावे तीर्थकर श्री १०८ मुनी सुव्रतजी हे समकालीन म्हटले जात होते. प्रभु श्री रामचंद्रजींना 'अतंगलवण' आणि 'मदनांकुश' नावाचे दोन राजकुमार होते, जे 'लव' आणि 'कुश' या नावाने प्रसिद्ध आहेत. या दोघा बन्धूंनी संसार असार समजून महेन्द्रोदय जंगलात जाऊन १०८ अमृतेश्वरमुनी यांच्याकडून दीक्षा घेतली होती. तिथून ते स्वतःच्या 'संघा'सहित दक्षिणेकडे जाणाऱ्या मार्गातील 'पावागढ'ला येऊन टेपले. त्यावेळी 'लव-कुश' यांना स्वतःच्या जीवनाचा अंत समीप आल्याचे ज्ञान झाले. ते 'पावागढ' पर्वतावर थांबले आणि तपश्चर्या वगैरे करून मोक्ष (निर्वाण) पावले. पाच कोटी मुनिराजपण या पर्वतावर तपश्चर्या करून मोक्ष पावले. ही हकिकत जैन ग्रंथांमधून मिळते. सद्या 'दुधिया' तलावाच्या काठी असलेली श्री लव-कुश-चरणांची छोटी मंदिरे या हकिकतीला पुष्टी देतात.

पताई राजाच्या कहाणीवर अनेक कथा, नाटके, गरबा-गीते वगैरे रचली गेली आहेत. पावागढ आणि पताई रावळ यांचा इतिहास व दंतकथा एकमेकांपासून अलग करणे अशक्य आहे. म्हणूनच आजसुद्धा तेवढ्याच श्रद्धेने घरोघरी ही गीते गायली जातात....

''माँ पावां ते गढ्वी उतऱ्या महाकाळी रे!''....

---

# परमपूज्य डोंगरे महाराज यांची अमृतवाणी

- श्री. र. वि. घेवारे
बार्शी, सोलापूर.

कृष्णभक्तीत सारं जीवन ज्यांनी समर्पित केलं ते श्री श्री श्री १००८ परमपूज्य कै. रामचंद्र केशवजी डोंगरे महाराज वयाच्या सातव्या वर्षी पंढरपुरात विद्याभ्यासाकरिता होते. गुरूजींनी त्यांच्या जिज्ञासू पवित्र आत्म्याला ओळखले आणि खूपच माधुर्यपूर्वक त्यांना शिकवू लागले. वेदांतापासून त्यांनी क्रमवार सुरुवात केली. चार वेद - सहा शास्त्रे - अठरा पुराणे ह्या सर्वांमध्ये ते पारंगत होते. जेव्हा-जेव्हा डोंगरे महाराज गुरूमुखामधून भागवतविषयक कथा ऐकत असत तेव्हा ते स्वत:ला धन्य समजत असत. एक एक भागवत कथा त्यांच्या हृदयात खोलवर रूजली आणि श्रीमद्भागवतावरच त्यांचं प्रगाढ प्रेम बसलं. भागवतामधील दशम स्कंधामध्ये वर्णन केलेली श्रीकृष्ण-बाललीला प्रत्यक्ष त्यांच्या दृष्टीसमोर उपस्थित होत असे. अशारीतीने कृष्णमय झालेल्या महाराजांना नित्य श्रीकृष्णदर्शन होऊ लागले. मराठी, गुजराथी, हिन्दी ह्या तिन्ही भाषांमधून भागवतकथांचं निरूपण सुमधुर वाणीनं करीत.

कार्तिक, कृष्ण षष्ठी, दिनांक ११/११/८७ ला सकाळी पावणेदहा वाजता डोंगरे महाराज श्रीमद्भागवत महायज्ञाचे यज्ञवेत्ते म्हणून बार्शीत आले. पांढरेशुभ्र धोतर, अंगावर फक्त उपरणे, अनवाणी पाय, वामन अवतारातील जणूकाही बटूच ! करकमल जोडलेले, अनाहत नाद.... नारायण नारायण. मंडपाच्या दारातील याचकांना दान देऊन, राधा-कृष्णाला वंदन करून आसनस्थ झालेल्या डोंगरे महाराजांनी ॐ कार सुरु केला. नाभीपासून निघालेला तो ॐकार नाद एका अनोख्या ललामभूत संवेदनांनी भारलेला होता. २० हजार श्रोत्यांना तो ॐकार भारून गेला. सर्व देवतांना वंदन करून रामचंद्रजी डोंगरे महाराजांच्या अमृतवाणीला सुरूवात झाली. त्या अमृतवाणीच्या गंगौघात सतत १० दिवस सकाळ-संध्याकाळ भाविक सुस्नात होत होते. या दहा दिवसांमधील सर्व कथा शब्दबद्ध करण्याचं भाग्य आम्हाला लाभलं तरीदेखील त्या सर्व न देता त्यातील 'विचारधन' 'श्री साईलीला'च्या वाचकांना देणं आम्ही आमचं परमकर्तव्य समजतो.

परमेश्वराच्या भक्तीनं मानवी शरीरात सद्गुणांची जोपासना होते. सद्आचार, सद्विचार, सद्वर्तन याकरिता भगवंतानी मानवी शरीर बहाल केले आहे. देहाला सुंदर समजणं मुर्खता होय ! देह किंवा देहावरील कपडे सुंदर नाहीत, तर त्या देहात वसणारा देव श्रेष्ठ आहे. आपण स्वत: आपल्याला सुधारावयाचं आहे, जगाला सुधारावयाच्या फंदात पडू नका. मन आणि डोळे शुद्ध करा. प्रत्येक जीवात भगवंताचं दर्शन होईल. भगवतभावानं जगाकडं पहा. पाणी आणि वाणी यांचा सदुपयोग करा. माझ्या हृदयकमलात नारायणाचा निवास आहे. अपार प्रेमभाव हृदयात जागृत ठेवून प्रगाढ श्रद्धेनं जेव्हा तुम्ही मूर्तीचं दर्शन घ्याल तेव्हा तुम्हाला जाणवेल की मूर्ती गालात हसतेय. ''जीव माझा पुत्र आहे'' त्याला सर्वकाही बहाल करावे. परंतु पुत्र जोपर्यंत लायक बनत नाही तोपर्यंत बाप त्याला काही देत नाही. तद्वत अपार श्रद्धेनं जीव जोपर्यंत शरण जात नाही तोपर्यंत परमात्मा काहीही देत नाही. म्हणूनच आर्त श्रद्धेनं जीवानं लायक पुत्र व्हावं. तन-मन-धन हे सारंकाही भगवंताचं असं जो मानतो तो हा भवसागर पार करतो. भक्तिकरिता धनाचा उपयोग करा. केवळ भोगाकरिता नको.

स्नान केल्याने शरीर शुद्ध होते, ध्यान केल्याने मन शुद्ध होते, दान केल्याने धन शुद्ध होते. तुमच्या आवडत्या उपास्य दैवताचे चिंतन करा, ध्यान करा. अशा मंगलमय ध्यानानं परमसद्गुण माणसामध्ये येतात. चित्ताची चंचलवृत्ती चिंतनाने संपते. नाम-स्मरणाने तन्मयता येते. ध्यान-ज्ञान-भक्ती-सत्कर्म करीत असताना कामवासना भक्तिमार्गात अडथळा उत्पन्न करते. ज्याला वासनेचा स्पर्श होत नाही तो मंगलमय. सर्व जीवांना अमंगल वासनाच दु:खसागरात लोटते. जे सत्य आहे, जे महन्मंगल आहे त्याचा शोध घ्या. सत्याचा शोध घ्यावा. भक्तिरसात मन गुंतवा. जीव आणि शिव यांच्या मिलनालाच लय म्हटले आहे. जे अशाश्वत आहे, नाशवंत आहे, दु:खमय आहे अशा विनाशी सुखाच्या मागे माणूस धावतो आहे. जसे लाडू व साखर, माती व घडा, तद्वत् चेतन परमात्मा जगाच्या अणु-रेणूमध्ये भरून उरला आहे. भक्ती म्हणजे प्रेम होय ! प्रेमामध्ये समर्पणाची भावना असते, मागण्याची वा घेण्याची नसते. मागितल्याने भाव-भक्ती कमी होते. निरपेक्ष भावनेनं भगवंताची भक्ती करा. जगाकडं उपेक्षा वृत्तीनं पहावं, अपेक्षा ठेवून मुळीच नको. उत्तम भोग मिळावेत म्हणून भक्ती नसावी. जीवाच्या सुकृतानुसार परमात्मा न मागता सर्वकाही देतो. मुक्तीची दासी भक्ती आहे. भोगी कधीच योगी बनत नाही. भक्तीचा अधिकार सर्वांनाच आहे. भक्ती अतिमधुररस आहे. उपभोगाची समाप्ती करा. भक्तीची सुरूवात करा. रोगांनी शरीर व्याधीग्रस्त झाल्यानंतर रोगांचा विचार करणं अयोग्य आहे. मानवाचा परमेश्वराशी झालेला वियोग किंवा ताटातूट हाच फार मोठा रोग आहे. म्हणूनच परमेश्वराशी संयोग ठेवा. परमानंदात जो तन्मय होतो त्याला सारं जग ब्रह्मरूपच वाटतं. प्रत्येक जीव हा ईश्वराचा अंश आहे, याची जाण ठेवा.

सन्त अलौकिक आनंद देतात, सत्वगुण वाढवितात, तमोगुण कमी करतात. गुरु आणि शिष्य दोघेही निष्काम आणि निरपेक्ष हवेत. लोभी गुरू व लालची चेला ह्या दोहोंचं वसतीस्थान नरकच होय ! संसारातील सारं प्रेम स्वार्थाने भरलेलं आहे. म्हणून प्रपंचातील दु:खाकरिता रडू नका. परमेश्वरप्राप्तीकरिता रडा, इतरांना रडवू नका. अंत:करणापासून मारलेली हाक परमेश्वराला समजते. हृदय पिळवटून त्याचा नाम-जप करा.

# तूर्तबोध

संकलन : श्री. दे. भा. सोनवणे गुरूजी
डोंगर किन्ही, बीड.

श्री गणेशाय नम: ॥
श्री सरस्वत्यै नम: ॥
श्री गुरुभ्यों नम: ॥
श्री कुलदेवतायै नम: ॥
श्री मातापितृभ्यां नम: ॥
श्री आदिपुरुषाय नम: ॥

जयजयाजी गणपतिराया ॥
निरसोनीया सकळ माया ॥
न्यावे मज मुळाच्या ठाया ॥
कृपा करोनि ॥१॥

जयजयाजी गणपति ॥
बोलवी मज अध्यात्ममती ॥
जणू प्रकाशे स्वयंज्योती ॥
नित्यानित्य ॥२॥

तूं गणाधीश गणगोसावी ॥
माझे मज चुकले वर्म दाखवी ॥
जीव शिवा परते भेटवी ॥
दीनदयाळा ॥३॥

जयजयाजी गणराजा ॥
वक्रतुंडा वक्रपूजा ॥
शोभती चारी भूजा ॥
महाशोभा ॥४॥

जयजयाजी लंबोदरा ॥
मज न्यावे मुळाच्या घरा ॥
चुकवी जन्ममरणाचा फेरा ॥
कृपा करोनि ॥५॥

जयजयाजी शारदेदेवी ॥
जें जें आठवले माझे जीवी ॥
बोलती अध्यात्माची पदवी ॥
दीनदयाळे ॥६॥

जयजयावो शारदे वेल्हाळा ॥
चाले तुझेनि कवित्वकळा ॥
फुटे ब्रह्मरसाचा जिव्हाळा ॥
महासंतोषें ॥७॥

जयजयावो ब्रह्मचारी ॥
तूं तारिसी भवसागरी ॥
अज्ञानाते परते सारी ॥
महादेवी ॥८॥

जयजयावो शारदे ॥
बोलवी ग्रंथाचे गुजहित ॥
तूर्तबोधाचे बोधवी बीज ॥
महाशक्ति ॥९॥

जयजयावो शारदे आनंदी ॥
भक्ता स्थापिसी निजपदी ॥
चाले तुझे नि कवित्व सिद्धी ॥
महाकृपाळे ॥१०॥

जयजयावो श्री गुरुनाथा ॥
म्या चरणावरी ठेवोनिया माथा ॥
अध्यात्म बोलवी आतां ॥
दीनदयाळा ॥११॥

जयजयावो सद्‌गुरू ॥
तुझेनि कृपे अज्ञान परते सारू ॥
महासुखाते हेरू ॥
स्वामिया ॥१२॥

जयजयाजी सद्‌गुरू स्वामी ॥
दाविसी रामरूपरामी ॥
तूं चालक अंतर्यामी ॥
सदोदित ॥१३॥

तूं दाविसी निजाचा निज ठेवा ॥
तुझेनि साक्ष जीव शिवा ॥
काय करूं म्या व्यर्थ हेवा ॥
अनाथ बंधु ॥१४॥

जयजयाजी गणपतिराया ॥
तूर्तबोध ग्रंथ करावया ॥
दे मज कवित्व रसनाथा ॥
अध्यात्म शोधावया ॥१५॥

तूर्तबोध ग्रंथ अमोल ॥
तेथीचे अध्यात्म महाखोल ॥
तेथे हैबती बापुडे काय बोले ॥
मतिहीन ॥१६॥

जयजयाजी सद्‌गुरूस्वामी ॥
ज्ञानाची झाली स्वामी ॥
भुली पडली आत्मारामी ॥
काय ह्मणोनिया ॥१७॥

मजसीच मी नेणोनि ॥
ज्ञानाची केली महाहानी ॥
कैसे होईल निधीनी ॥
न कळे मज स्वामिया ॥१८॥

या संसारे वेडे केले ॥
जना देखता जन मेले ॥
काही सार्थक नाही झाले ॥
पडली भुली ॥१९॥

मजसीच मी नेणता ॥
काळ करी थोर सत्ता ॥
पडली अघोर चिंता ॥
काय रे करूं ॥२०॥

मज काही भासेना ॥
आत्मरूप ठसेना ॥
सार्थक कांही दिसेना ॥
थोर हानि ॥२१॥

पडोना निशीचे अंधारी ॥
आत्मसुखाची झाली चोरी ॥
चौऱ्यांशीची आला घरी ॥
सद्‌गुरूराया ॥२२॥

सद्‌गुरू दातारी ॥
ने मज निज मंदिरा ॥
चुकवी जन्माचा फेरा ॥
दीनदयाळा ॥२३॥

मातेच्या उदरी ॥
अजपाजप करी ॥
येऊनिया बाहेरी ॥
चुकी मोठी ॥२४॥

हातीचे गेले निजधन ॥
तेणे दुःख झाले दुणे ॥
कैसे अदृष्ट आले उणे ॥
न कळे मज ॥२५॥

मी पडलो मायाजाळी ॥
कोण सोडवील ये काळी ॥
पाठी लागली जन्माची पाळी ॥
काय रे करूं ॥२६॥

या संसारापासूनि वेगळे करावे ॥
माझे आत्मस्वरूप मज भेटावे ॥
मुळाच्या घरासी मज न्यावे ॥
दीनदयाळा ॥२७॥

या संसाराचे निमुळे ॥
माझे आत्मसुख मज न मिळे ॥
जाचिती काम-क्रोधादिक ॥
कुळे कैसे करूं ॥२८॥

मी चुकलो आपल्या ठाया ॥
नेणोनि भक्ति उपाया ॥
मज तारावे गुरूराया ॥
भवसागरी ॥२९॥

माझी मज पडली चुकी ॥
अविद वस्तु बाण सुलखी ॥
तेथे कैसी लागेल टाकी ॥
स्वयंभू गोळा ॥३०॥

आत्म्याची नाही अजुनी भेटी ॥
परि काळ लागला असे पाठी ॥
पडलो महा आटाआटी ॥
परि काळ लागला असे पाठी ॥३१॥

आता राया ऐसें करावे ॥
माझे मज भेटवावें ॥
जेथिले तेथे ठेवावे ॥
कृपादृष्टी करोनी ॥३२॥

प्रपंचाची आटाआटी ॥
लोभेसी असे पडली मिठी ॥
कैसे होईल शेवटी ॥
ते कळेना गुरूराया ॥३३॥

माझं मजला भेटवी ॥
निजडोळ्यांनी दाखवी ॥
ब्रह्मरसाते चाखवी ॥
दीनानाथा ॥३४॥

राया संसार महाघोर ॥
वेढले कैसे थोरथोर ॥
लागला पाठी काळचोर ॥
दु:ख मोठे ॥३५॥

लागली असे माया ममता ॥
देवा चुकलो निजहिता ॥
तारी मज आता ॥
दीनदयाळा ॥३६॥

आता ऐकूनी बोले सद्‌गुरूमुनी ॥
धन्य शिष्या शिरोमणी ॥
लागले आता अजपाचे ध्यानि ॥
जेणे स्वरूप तुला कळे ॥३७॥

बोले कैवल्यनाथ सद्‌गुरू ॥
तुझे स्वरूप तुजकडे मोहरू ॥
तुज मज हेंचि तारूं ॥
तारावया ॥३८॥

तूं तापलासी भवतापे ॥
आता सांगेन सुख सोपे ॥
जेणे हरतील महापापे ॥
निर्मळ होसी ॥३९॥

तुंवा संतसंगती धरावी ॥
लाधेल आत्मपदाची पदवी ॥
मूळची सोय हे लावी ॥
सद्‌गुरूकृपे ॥४०॥

साधनेवीण देखणे देखावे ॥
देव होऊनी देवापोटी रिघावे ॥
निरंतर शुचिर्भूत असावे ॥
देवपूजेसी ॥४१॥

तुझे गुज असे तुजपुढे ॥
ते कोणासी नातुडे ॥
नेणोनि त्या होसी मूड ॥
वेडेपणे ॥४२॥

संताची संगति थोर ॥
देही होय चमत्कार ॥
दिसो लागे सारासार ॥
संतसंगतीने ॥४३॥

संताची संगति करावी ॥
तुझी वस्तु तुज होईल ठावी ॥
जेथे तेथे देखणी कळा देखावी ॥
निजात्मखुणे ॥४४॥

न कळे या संतांचा महिमा ॥
भेटविती आत्मारामा ॥
देवावीण ठाव नाही रिकामा ॥
देवची दिसे सारा ॥४५॥

देखणे परते सारावे ॥
देखणेवीण देखावे ॥
रूपावीण ओळखावे ॥
आत्मरूप ॥४६॥

मुळावीण मुळी जावे ॥
रूपावीण रूपी रिघावे ॥
देवावीण देखावे ॥
साक्षरूप जे ॥४७॥

तूं शिष्य परम चतुर ॥
पुसतोसी अध्यात्मविचार ॥
उल्हासविला सुखसागर ॥
निजभर्तेचे निभरे ॥४८॥

शिष्या थोर पडिला चुका ॥
नेणसी अध्यात्महित कौतुका ॥
समाधीच्या महासुखा ॥
पडली भुली ॥४९॥

थोर दु:ख मातेचे पोटी ॥
दु:खे झाली कोटया-न्-कोटी ॥
आत्मरूपी नाही भेटीं ॥
थोर हानि ॥५०॥

देह पडे काळाचे खर्ची ॥
दृष्टी नाही आत्मसुख चर्ची ॥
शुद्धी नाही मूळ मुक्त घरची ॥
शिष्या दु:ख मोठे ॥५१॥

देहीच्या जाणोनि खाणाखुणा ॥
देहावेगळा देव जुनाट जुना ॥
कोठे नाही अधिक उणा ॥
शिष्यराया ॥५२॥

शिष्या तुझी अक्कल कोणती ॥
हारपले चिन्मय मोती ॥
नेणसी आत्मज्योती ॥
शिष्या दु:ख मोठे ॥५३॥

तूं जाण देहीच्या देवा ॥
तुझी तुज घडेल सेवा ॥
लाधेल जन्मोजन्मीचा ठेवा ॥
सद्‌गुरूकृपे ॥५४॥

शिष्या तुझे भाग्य मोठे ॥
पुससी आत्मत्वाची वाट ॥
जयासी नाही पाठपोट ॥
ते देखसी निजडोळा ॥५५॥

देव देही की देहावेगळा ॥
कोठे जाणावी आत्मकळा ॥
कोण फिरवी अजपाची माळा ॥
न कळे तुज भ्रांतिमुळे ॥५६॥

देव कैसा देखावा ॥
हा अनुभव कैसा घ्यावा ॥
देव कोठे ओळखावा ॥
शिष्या तुज न कळे ॥५७॥

शिष्या तुझे तूं नेणसी ॥
गर्भी कासावीस होसी ॥
नाना योनी हिंडलासी ॥
हे दु:ख कोण सोडवी ॥५८॥

पाठी लागली जन्माची पाळी ॥
गळा तो अज्ञान सांखळी ॥
वस्तु ही अखंड मोकळी ॥
न कळे तुज शिष्या ॥५९॥

(पृष्ठ क्र. १६ वर)

# मूलभूत सद्‌गुण

सर्वांना समान असणाऱ्या सद्‌गुणांचा मनुधर्मशास्त्रामध्ये उल्लेख आहे; ते सद्‌गुण असे :

(१) अहिंसा, (२) सत्य, (३) अस्तेयं, (४) शुचिता, (५) इंद्रियनिग्रह

वरील सद्‌गुणांबरोबरच, आपल्या मातेविषयी, पित्याविषयी, गुरुच्या ठायी आणि ईश्वराच्या ठायी असणारी निस्सीम आणि एकनिष्ठ भक्ती, या सद्‌गुणांचाही समावेश वेदांमध्ये सांगितला आहे.

वर उल्लेख केलेल्या पाच सद्‌गुणांचा आता विस्ताराने विचार करू या !

**(१) अहिंसा :**

कोणालाही जखम किंवा दुखापत करण्यापासून मनास आवरणे किंवा परावृत्त करणे म्हणजे अहिंसा ! अगदी मुंगीसारख्या क्षुद्र जीवाचीसुद्धा हत्या करू नये.

अहिंसा हे योगसिद्ध एक साधन आहे. योग म्हणजे 'मनोनिग्रह' - मनावर पूर्णपणे ताबा.

**योग: चित्तवृत्ति निरोध: ।**

मनोव्यापारावर असणारे नियंत्रण म्हणजेच योग !

आपल्या मनामध्ये इच्छा निर्माण होतात. मन अनेक गोष्टींचा विचार करते. मनोव्यापाराचे विविध प्रकार निर्माण होतात. सर्व प्रकारच्या दु:खाची जाणीव आपणास मनाद्वारेच होते. म्हणूनच म्हटले आहे :

**मन: एव मनुष्याणां**
**कारणं बंधमोक्षयो: ।**

- ध्यानयोग, भगवद्‌गीता

मन हेच मनुष्याच्या बंधनास कारण आहे. आणि मनुष्याच्या मोक्षासुद्धा तेच कारण आहे.

इंद्रियविषयात गढून गेलेले मन बंधनास कारण होते, तर इंद्रियविषयापासून अनासक्त असलेले मन मोक्षप्राप्तीस कारण होते.

आपले मन आपल्या ताब्यात रहात नाही. एखाद्या विषयाबद्दल मनास विचार करावयास सांगावे तर ते दुसरीकडेच धाव घेते. एखाद्या गोष्टीबद्दल विचार करू नको असे त्यास सांगितले तर तेही अशक्य ! अतिशय चंचल आहे मन !

(प्रस्तुत लेखकाचेच उदाहरण पहा ना ! एवढा विद्वताप्रचुर लेख आपण लिहितो आहे खरा, परंतु मनात विचार येतो, आपणास हे जमेल का ? लेख संपादकास पसंत पडेल ना ? त्याचप्रमाणे वाचकांस तो वाचनीय वाटेल काय ? वास्तविक, हा विचार तू करू नकोस सांगितले तरी मन ऐकत नाही.)

आपल्या तोंडास आपण ''बोलू नकोस !'' असे सांगितले तर ते बोलणार नाही. नेत्रांस ''पाहू नकोस !'' असे सांगितले तर नेत्र पहाणार नाहीत. परंतु मनास जर सांगितले की, ''विचार करू नकोस !'' तर ते केवळ अशक्य !

आपले मन जर खरोखरच आपल्या ताब्यात असेल तर आपल्या इच्छेप्रमाणे त्याने कृती करावयास हवी. ''विचार करू नकोस !'' असे सांगितले तर त्याने विचार करू नये.

एखादा वेडा माणूस कधीही गप्प बसणार नाही. तो नेहमी बडबडच करेल ! त्याला गप्प बसवणे अशक्य आहे. याचप्रमाणे मनाच्या बाबतीत आपण वेडेच आहोत ! आपल्या मनावर आपला ताबा रहात नाही. आपले मन जर खरोखरच पूर्णतया आपल्या ताब्यात असेल तर आपण सांगू त्याप्रमाणे त्याने वागले पाहिजे. आपण त्यास विचार करावयास सांगितले तर त्याने विचार करावयास हवा आणि ''विचार करू नकोस !'' असे सांगितले तर विचार करणे त्याने थांबविले पाहिजे. अशी परिस्थिती जेव्हा असेल त्याच वेळी आपले मन आपली आज्ञा पाळते असे म्हणता येईल. आपणास दु:ख झाले तर आपणास ते आपल्या मनाद्वारेच जाणवते. अशा वेळी आपण जर मनास सांगितले की, ''दु:खाचा विचार करू नकोस !'' तर मनाने आपली आज्ञा पाळली पाहिजे. हेच मनावरील नियंत्रण होय ! असा पूर्ण ताबा जर आपल्या मनावर असेल तर दु:खाची जाणीव होणार नाही. एखाद्या वाघाने जरी अकस्मात समोर येऊन डरकाळी फोडून आपणास घाबरवण्याचा प्रयत्न केला, अन् आपण मनास सांगितले, ''भिऊ नकोस !'', तर निर्भयपणे ते अविचल राहील, स्थिर राहील.

आपण मनास रडण्यास सांगितले, तर ते रडावयास हवे, आणि ''रडू नकोस !'' असे सांगितले तर शांत रहावयास हवे. परंतु सहसा असे घडत नाही. रडावयास काही कारण नसलाही ते रडते. परंतु ज्यावेळी मनावर पूर्ण ताबा असेल त्यावेळी जरी रडण्यास कारण असेल, आणि मनास सांगितले की ''रडू नको !'' तर ते रडणार नाही, शांत राहील. मनास ''रागावू नकोस !'' असे सांगितले तर ते शांत राहील.

सामान्यत: आपले तोंडही आपल्या ताब्यात नसते. जिव्हेवरही आपले नियंत्रण नसते. मूर्खपणे आपण काही बोलून जातो, आणि नंतर मग आपण ''तसे बोलावयास नको होते'' म्हणून खेदही प्रगट करतो. (वेड्या माणसामध्ये व आपणामध्ये थोडा फरक आहे. एखादा वेडा माणूस काही वेळा तो वेडा आहे असे कबूल करतो व म्हणतो, ''मूर्खाप्रमाणे मी बडबडत आहे !'')

अशी वेळ आपणावर येऊ नये हे टाळण्यासाठी आपण मनावर नियंत्रण ठेवावयास हवे.

मनावरील संपूर्ण नियंत्रणाची स्थिती ही एखाद्या अखंड वहाणाऱ्या तेलाच्या धारेप्रमाणेच आहे ! मनाचा प्रवाह हा नित्य वहातच असतो.

परमेश्वराच्या दर्शनाने परमानंद होतो ! मनास जर सांगितले की ''त्या परमोच्च आनंदी स्थितीत रहा !'', तर ते आनंदी स्थितीतच राहील. मनास ''परमेश्वरस्वरूप होऊन रहा !'' असे सांगितले तर ते परमेश्वर-स्वरूपात विलीन होईल. आणि

मग मन कोणत्याही आज्ञेचे पालन करेल. हीच योगसिद्धी होय ! आणि असे सिद्धपुरुष हेच योगी होत !

आपण खरोखरच सुखी होऊ अशा मार्गाचा विचार न करता मन अन्य गोष्टींचा विचार करते. अशा सुसाट आणि चंचल मनावर संपूर्ण ताबा मिळविण्यासाठी आपण मार्ग शोधावयास हवा. आणि हे आपले इप्सित मृत्यूपूर्वीच आपण साध्य करावयास हवे !

भगवान श्रीकृष्ण आणि आद्य शंकराचार्य दोघांचेही मनावर संपूर्ण नियंत्रण होते. दोघेही सर्वश्रेष्ठ योगी होते.

प्रसंग येईल तेव्हा इच्छाशक्ती आणि क्रोध यावर अंकुश ठेवण्याचा, नियंत्रण ठेवण्याचा सर्वकष प्रयत्न मनुष्याने करावयास हवा. यामध्ये जो यशस्वी होतो त्यास 'युक्त' (योगी) म्हणतात. योगसाधना ही ऋषी, मुनींसाठीच केवळ नाही. औषधाची आवश्यकता कोणास आहे बरे ? व्याधीग्रस्त - आजारी माणसास औषधाची आवश्यकता असते ना ! आपणसुद्धा मनोव्याधीने ग्रस्त आहोत. आणि म्हणूनच आपणास 'योगाची' आवश्यकता आहे.

मनावर नियंत्रण कसे ठेवता येईल ?

मनावर नियंत्रण ठेवण्याचे मार्ग आहेत :

(१) बाह्य नियंत्रण

(२) अंतर्नियंत्रण

योगविद्येच्या जाणकाराकडून (जे योगी आहेत - मनावर ज्यांनी ताबा मिळविला आहे) आपण मनावर नियंत्रण कसे ठेवायचे ते शिकले पाहिजे.

काही लोक जन्मत:च गौरवर्णी असतात. काही इंग्लंडसारख्या थंड हवामानाच्या प्रदेशात थंडीपासून योग्य पोषाख करून गौरवर्णी होतात. काही पक्षी जन्मल्याबरोबरच उडू शकतात, काही पक्षी जन्मानंतर काही काळाने उडू शकतात. लहान मासे जन्मल्यानंतर लगेचच पोहू शकतात. तर मनुष्य जन्मानंतर थोडा मोठा होतो व मग पोहावयास शिकतो. अशाप्रमाणे ज्याचे मन मूलत:च नियंत्रणाखाली असते तो ईश्वर होय ! ईश्वर अविनाशी असून त्याचे मन अविचल असते.

विद्यारण्य आणि सदाशिव ब्रह्मेंद्र असे योगी होते की त्यांनी योग्य शिस्तीचे आचरण करून मनावर नियंत्रण केले. त्यांनी योगाच्या संदर्भात मार्गदर्शन केले आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे मन ताब्यात ठेवण्यासाठी दोन मार्ग आहेत :

(१) बाह्य नियंत्रण :

उदा. दानधर्म, परोपकार, सदाचरण इत्यादी सद्गुण. या मार्गाचे विश्वासाने पालन करून मन सुसंस्कृत होते.

(२) दुसरा मार्ग म्हणजे अंतर्नियंत्रण. याचे अनेक मार्ग आहेत. त्यापैकी अहिंसा हा एक होय !

अहिंसा मार्गाचे पालन करून मनावर ताबा मिळवता येतो.

साध्य करता येणार नाही अशी जगात एकही गोष्ट नाही. मन ज्यावेळी ताब्यात नसेल त्यावेळी एखादीही चांगली गोष्ट साध्य होणार नाही. ज्याप्रमाणे एखादा रानटी हत्ती जर माणसाळला नाही तर त्याचा आपणास काहीही उपयोग होणार नाही, तो फक्त त्रासदायकच होईल. परंतु, जर तो माणसाळला तर त्याच्याकडून कितीतरी गोष्टी आपणास करून घेता येतील. अशा कितीतरी हत्तींचे बळ मनास आहे. विश्वामित्र आणि श्री हनुमानजी यांनी मनावर पूर्णपणे नियंत्रण मिळवले होते आणि म्हणूनच ते सर्वशक्तिमान झाले ! आपल्याजवळही तेच मन आहे. आपल्या मनास आपण आपल्या आज्ञा पालन करण्याचे व्यवस्थित शिक्षण दिले तर आपणाकडूनही दैदिप्यमान कार्य होऊ शकेल. वेदान्ताप्रमाणे सर्व विश्व हे मनोबलाने निर्माण झाले आहे.

मानवी मन हे एखाद्या वेताळाप्रमाणे आहे. विक्रमादित्याच्या गोष्टींमध्ये ज्याप्रमाणे ताब्यात आणल्यानंतर सांगितलेली सर्व कामे वेताळ निमूटपणे करीत असे, त्याचप्रमाणे संपूर्ण नियंत्रणाखाली असलेले मनही करू शकेल. आणि मन पूर्णपणे ताब्यात आणणे म्हणजेच योगप्राप्ती.

अहिंसा हे योगप्राप्तीचे एक अंग आहे. ज्यांना योगसिद्धी प्राप्त झाली ते म्हणतात, ''आम्ही अहिंसेच्या मार्गाने गेलो आणि मन संपूर्णपणे नियंत्रणाखाली आणू शकलो.'' याप्रमाणे अहिंसेचे वर्णन मनुधर्मशास्त्रात 'योगाचे अंग' असा केला आहे. यावरून अहिंसेचे महत्त्व लक्षात येईल.

अशातऱ्हेने योगसूत्राप्रमाणे काया, वाचा आणि मनाने आपण अहिंसेचे पालन केले तर आपल्या सान्निध्यात येणारा प्रत्येकजण शांतीसुखाचा लाभ घेईल.

दुसऱ्यास दुखापत करण्याचा विचारही कोणी करू नये. एवढेच नव्हे तर दुसऱ्यास क्लेशदायक होईल असे वाक्‌प्रहार किंवा भाषण करू नये. दुसऱ्यास कधीही शारीरिक पीडा देवू नये. एखाद्यास दुखापत करावी असा माणसाचा मूळ स्वभाव नसतो. परंतु एखाद्याने चूक केली किंवा अपराध केला तर स्वाभाविकपणे त्याचा राग येतो व त्यास शासन करावे असे वाटते. परंतु समजा आपल्याच मुलाने आपल्या घराचे छप्पर पेटवून दिले तर आपण त्याला रागावू काय ! प्रथम आपण ताबडतोब आग विझवू आणि असे प्रसंग वरचेवर घडू नयेत अशी काळजी घेऊ. या मुलाकडे बघण्याचा जसा आपला दृष्टिकोण असतो त्याचप्रमाणे आपल्याला पीडा देणाऱ्याविषयी आपला दृष्टिकोण हवा. हीच अहिंसा. अहिंसेचा मुख्य उद्देश मनावर ताबा मिळविणे हा होय ! अशातऱ्हेने अहिंसेचे पूर्णतया पालन करणाऱ्यांच्या सान्निध्यात एखादा खुनी प्रवृत्तीचा मनुष्य आला तरी त्याच्या वृत्तीमध्ये पालट होऊन तो शांत व सत्प्रवृत्त होईल. दुष्ट लोकांचे मनसुद्धा अशा योगी पुरुषाच्या सान्निध्यात शांत होईल.

संन्याशाने मात्र अहिंसा धर्माचे काटेकोरपणे पालन करावयास हवे. संन्यास-दीक्षा घेताना हे त्याच्यावर बंधन घातले जाते. त्याने फुले तोडू नयेत, स्वयंपाक करू नये (सूक्ष्म जीवांची हिंसा घडू नये यासाठी !). गृहस्थधर्मी लोकांना मात्र थोड्या प्रमाणात अपवाद आहे. पूर्णपणे अहिंसापालन त्यांना करता येणार नाही.

**(२) सत्य :**

**वाङ्मनसयो ऐक्यरूपम् सत्यम् ।**

वाणी आणि मन यांच्या एकरूपतेमुळे जे व्यक्त होते ते सत्य होय !

आपल्या मनात जे काही आहे ते व्यक्त करण्यासाठी परमेश्वराने आपणास वाणी दिली आहे. आपण जर असत्य बोललो तर पुढील जन्म आपणास पशूचा येईल ! मनात जे असेल तेच वाणीमध्ये व्यक्त व्हावयास हवे. ज्याप्रमाणे गृहस्थाच्या संदर्भात अहिंसेसंबंधी थोडा अपवाद केला आहे त्याप्रमाणे सत्याविषयीही थोडा अपवाद केला आहे. परंतु तो सर्वांसाठी आहे.

उदा. एखादा मनुष्य दुसऱ्या माणसातील दोष व्यक्त करतो, तो मनुष्य दुष्ट आहे असे तो सांगतो, त्या माणसाने असे दुष्कृत्य केले असे म्हणतो. याबाबतीत मनातील विचार जरी आपण जसेच्या तसे व्यक्त केले तरी ते सत्य असणार नाहीत. कारण सत्य हे सर्वांच्या कल्याणासाठी आहे. आपल्या मनातील राग व्यक्त करण्यासाठी आपण दुष्ट आहे असे म्हणतो ! परंतु हे जरी सत्य असले तरी ज्याच्यासंदर्भात ते असेल त्यास ते दु:खदायी होऊ नये. सत्य सौम्य शब्दात व्यक्त करावे, जेणेकरून त्याचे मन दुखावणार नाही, आणि ते त्याच्या हितासाठी असावे. आपल्या मनातील इच्छा किंवा राग व्यक्त करण्यासाठी सत्याचा उपयोग करू नये. सत्य हे सर्वांच्या कल्याणासाठी असावे.

**सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्**
**न ब्रूयात सत्यं अप्रियम् ।**
**प्रियं च नानृतम् ब्रूयात्**
**एष धर्म: सनातन: ॥**

आपल्या मनाने नित्य सत्याचे पालन करावयास हवे. असत्य बोलावे असे मनातसुद्धा आणू नये. स्नान केले नसताना स्नान केल्याचा आविर्भाव आणणे म्हणजे शारीरिक (कायिक) असत्य होय. आणि म्हणूनच मनुष्याने काया, वाचा आणि मनाने नित्य सत्याचे पालन करावयास हवे !

सत्य हे मन संयम करण्याचेही साधन आहे.

सत्यामुळे आनुषंगिक लाभही होतो.

सत्य धर्माचे नित्य पालन केले तर मन नेहमी सत्याचा विचार करेल, आणि मुखातून नित्य सत्य वाणीच बाहेर पडेल ! आणि मग जे बोलले जाईल ते सत्यच असेल ! चुकून एखादा शब्द उच्चारला गेला किंवा बोलला गेला तर तो खराच ठरणार ! सत्यच होणार ! सत्याचे पालन केल्याने उच्चारलेले शब्द प्रभावी होतात. अशी जी दिव्य, प्रभावी शक्ती प्राप्त होते तीच शापवाणी किंवा आशीर्वाद होते. अशा सत्यवादी महान योगी पुरुषाने सांगितले की ''आज पौर्णिमा आहे !'' तर पौर्णिमेचा दिवस नसतानाही पूर्ण चंद्रमाचे दर्शन होईल. अशातऱ्हेने योगी पुरुषाच्या वाणीमध्ये आशीर्वाद देण्याचे किंवा शाप देण्याचे सामर्थ्य असते आणि त्याचे वचन खरेच ठरते.

समजा, आपल्या मनात असा विचार येईल की आपणास धनाची इच्छा नाही. हे कसे समजणार ? तर अगदी स्वप्नामध्येसुद्धा धनाची इच्छा आपणास न झाली पाहिजे. तरच ठामपणे म्हणता येईल की आपणास धनाचा लोभ नाही किंवा इच्छा नाही. स्वप्नामध्ये जर आपणास एखाद्याने धन देऊ केले आणि आपण म्हणालो, ''ठीक आहे, आण ते इकडे !'' तर खरोखरच आपणास धनाची इच्छा नाही असे म्हणता येणार नाही. आणि म्हणूनच आपण पूर्ण निष्ठेने सत्याचे पालन करावयास हवे ! अगदी स्वप्नातसुद्धा सत्यापासून ढळता कामा नये. तरच सत्याची प्रचिती येईल. आणि आपण जे बोलू ते खरेच ठरेल.

**सत्यप्रतिष्ठायाम् क्रियाफलाश्रयत्वम् ।**

– योगसूत्र

मात्र, मागे उल्लेख केल्याप्रमाणे तात्कालिक फायद्यासाठी सत्याचे प्रयोग करू नयेत.

सत्यपालनाबरोबर मिळणारा मोठा फायदा म्हणजे आसक्ती उरत नाही, आणि वैराग्य प्राप्त होते.

अशा योग्यास गुप्त धन दिसण्याचे सामर्थ्य (सिद्धी) प्राप्त होते. एखाद्या व्यक्तीने म्हटले की, ''मी निर्लोभी आहे, परंतु गुप्त धनाचा साठा मला दिसत नाही !'' तर अशी व्यक्ती निरिच्छ कशी असू शकेल ? कारण गुप्त धन प्राप्त व्हावे अशी इच्छा त्याच्या मनात आहे.

**(३) अस्तेय (चौर्यकर्म न करणे) :**

अयोग्य विचारास मनात थारासुद्धा देऊ नये.

एखाद्याची मिळकत किंवा धन लुबाडून घेणे किंवा पळवून नेणे म्हणजे चौर्यकर्म होय ! जबरदस्तीने कुणाचेही धन अथवा ऐवज लुबाडू नये. खोटे दस्तऐवज किंवा कागदपत्र तयार करून एखाद्याची मिळकत लुबाडणे ही तर सर्वात वाईट गोष्ट आहे.

**(४) शुचिता (स्वच्छता) :**

देहाची स्वच्छता राखली तर मन पवित्र राहील. शरीराच्या स्वच्छतेचे नियम धर्मशास्त्रामध्ये सांगितले आहेत. परंतु गेल्या पन्नास वर्षांत आपल्या देशात स्वच्छतेचे नियम बदलून गेले आहेत, कालबाह्य झाले आहेत. शरीराची स्वच्छता केव्हा व कशी राखावी हे शास्त्रात सांगितले आहे. एवढेच नव्हे तर कोणते पात्र कशा पद्धतीने स्वच्छ ठेवावे याचाही उल्लेख आहे.

कोणत्याही कार्यास किंवा कृतीस स्वच्छता ही सर्वप्रथम आवश्यक आहे. याकडे दुर्लक्ष होवू नये. स्वच्छतेचे महत्त्वच आपणास समजले नाही तर मग आपण मनावर नियंत्रण कसे मिळवणार ?

उपदेश नुसता ऐकून सोडून देणे किंवा दुर्लक्ष करणे म्हणजे, ''नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे'' अशीच परिस्थिती ! आपण जे शिकलो ते आचरणात आणले पाहिजे. उत्तम प्रकारे जगावयाचे असेल तर स्वच्छता अंगी बाणावयास हवी. लहानापासून मोठ्यापर्यंत प्रत्येकाचे पाणी पिण्याचे भांडे स्वतंत्र असावे. दुसऱ्याच्या पेल्यातून पाणी पिऊ नये. स्वच्छतेचे नियम प्रत्येकाने काटेकोरपणे पाळावेत.

**(५) इंद्रिय-निग्रह :**

इंद्रियांवरही आपला ताबा हवा.

आपण इंद्रियाधीन होवू नये. प्रत्येक इंद्रियास एवढेच मिळेल अशारीतीने इंद्रिय-संयमाचा प्रयत्न करावा. याच मापदंडाप्रमाणे इंद्रियसुखाचा आपण अनुभव घ्यावा. इंद्रिय-निग्रहाचे सामर्थ्य आपण अंगी बाळगावयास हवे.

(पृष्ठ क्र. १६ वर)

# धर्म, धार्मिकता आणि संस्कृती

- श्री. श्रीनिवास दिगंबरराव गोरे
राजुरी, पुणे.

धर्म आणि धार्मिकता हे मानवी जीवनाचे फलित होय ! धर्म-संस्कृती ही धर्माच्या, तसेच संतांच्या मौलिक विचारांचे महत्त्व समजाविते. मानवाची निर्मिती ही धर्मापासून झाली आहे. संस्कृती व तत्वमूल्यांचा विचार धर्मातून निर्मित होऊन वैचारिकता प्रसारित झाली. नीती म्हणजे धर्म आणि अनीती म्हणजे अधर्म. धर्म मानवाची प्रगती करतो. मानवी मनात परिवर्तनाची दिशा धर्मातून जागृत होते.

आपल्या हिंदु धर्मात अनेक मौलिक संत-महात्मे होऊन गेले. ईश्वराचे चिंतन हे एक परमसुख हा संतांनी दिलेला अमूल्य संदेश होय ! ईश्वराचे अस्तित्व हे कणाकणात भरले आहे. संतांनी स्वत:च्या सुखाचा त्याग केला. त्या त्यागातून मानवाला धर्माची महती संतांनी समजाविली. संतांचे धार्मिक, उद्‌बोधक विचार आत्मसात केल्यास नीती-अनीतीतील फरक उमगला जाईल.

आपल्या पुण्यपवित्र, मांगल्यमय भूमीत अनेक संत-महात्में उदयास आले. हा आपल्या धर्माचा चिरंतन ठेवा होय ! क्षणिक, क्षणभंगुर सुखासाठी मानव अविचार करतो. मात्र हा अविचार मानवाचा विनाश करतो. धर्म व संस्कृतीत मानवाचे हित सामावलेले असते. आध्यात्मिक विचारातून तत्वशील मानव घडतो. तो तत्वशील मानव पूर्णपणे जीवनात यशस्वी होतो. ही यशस्वीता धर्मापासून, आत्मिक ज्ञानापासून मिळते.

धर्मातील धर्माचे मर्म पटविणारे सण, व्रत-वैकल्यं आत्मिक समाधान प्राप्त करून देतात. ते आत्मिक समाधान इतरत्र कुठेही प्राप्त होत नाही. संतांचे धार्मिक विचार आचरणात आणणे हे गरजेचे होय ! धर्मविचारातून मानवाचे व्यक्तिमत्व फुलते व ते दर्शविले जाते.

मानव धर्माचे पालन करीत नाही. म्हणजेच तो अविचार, अप्रवृत्तीकडे जाऊन स्वत:चा नाश करून घेतो. धार्मिकता ही त्याच्या मनात रूजलेली नसते. धर्माचे महत्त्व ज्याला उमगत नाही, त्याला जीवनाचा अर्थसुद्धा समजत नाही.

संतांचे मौल्यवान विचार किती श्रेष्ठ असतात ! ते विचार धर्मज्ञानातून घडलेले असतात. ईश्वर ही एक अशी अदृश्य शक्ती आहे की ती अप्रत्यक्षतेने कार्यस्थ राहते. संतांच्या धार्मिक विचारांतून महान ग्रंथांची निर्मिती झाली. त्या ग्रंथांतून धर्मविचाराची ज्योत आपल्या भावमय हृदयात तेवत ठेवली तर धर्मापासून मानव कधी परावृत्त होणार नाही. मात्र पैसा म्हणजे सर्वकाही असे मानणारी व्यक्ती धर्माला न मानता अधर्म-विचारांकडे जाते. शेवटी त्या व्यक्तीची वैचारिकता नष्ट होते.

संतांची, संतविचारांची निर्मिती व उदय हा धर्माचा विजय होय ! सत्य-असत्याचे महत्त्व मानवाला धर्म देतो. संत हे एक मानव होते. मग त्या मानवाच्या मनात, म्हणजे संतांच्या मनात संतविचारांची निर्मिती का होत नाही, याचा आपण गांभिर्याने विचार केला आहे का ? संतांमध्ये आणि आपल्यात एकच फरक आहे, संतांजवळ नैतिकता होती, संत निस्वार्थी होते, आपण मात्र स्वार्थी आहोत. म्हणून आपल्याजवळ अनैतिकता आहे. ही अनैतिकता आपणाला धर्मविचार व व्रतवैकल्यापासून दूर ठेवते. संतांनी जो विचारांचा ठेवा जतन करून ठेवला आहे, तो फार अवर्णनीय होय ! उदा. ज्ञानदेवांनी निर्मिलेली ज्ञानेश्वरी आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व दाखविते. ज्ञानियांचा देव, तो ज्ञानदेव, म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानाची तुलना करता येणार नाही. एवढे महान ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वरी धर्माचे प्रतीक होय !

संतांचे भावमय काव्य म्हणजे अभंग. ह्या अभंगांतून संतांनी धर्मजागृती केली. अभंगांतून संतांनी दर्शविले की हे मानवा, क्षणिक सुखासाठी तू अविचार करू नकोस. चिरंतन समाधानासाठी ईश्वराचे चिंतन कर ! हे चिंतन तुझ्या जीवनात तुला यश देणार आहे. ह्या ईश्वरी-चिंतनाने तुझे हित साध्य होणार आहे. परमसुखाचा मार्ग ईश्वरचिंतनातून प्रेरित होईल. परोपकाराची शिकवण देणारे संत किती थोर आहेत, त्यांची थोरवी किती महान आहे !

ईश्वराचे एकाग्रतेने स्मरण केले तर जीवनाचा खरा मार्ग प्राप्त होतो. ईश्वरी-चिंतनाने मन:शांती मिळून सदाचरणाचे स्वरूप जीवनात परिवर्तन घडविते. मनात ईश्वराबद्दल श्रद्धा ठेवावी. सत्पुरुषांच्या संगतीत आपले जीवन कृतकृत्य करावे. आपला स्वार्थ साधताना दुसऱ्याचे नुकसान होत असेल तर नि:स्वार्थाची भूमिका मनात ठेवून कृती करावी. सद्सद्विवेकबुद्धीचा संगम म्हणजे सत्पुरुष. संत, सत्पुरुष हे ईश्वरावतार आहेत, ही भावना शांतीचा मार्ग सुकर करते. संतांची अमोघवाणी फार महत्त्वपूर्ण आहे.

संतांच्या पुण्यशीलतेने ही भूमी पावन झाली. मानवी जीवनात धर्म आणि धर्म-संस्कृतीला फार महत्त्व प्राप्त झालेले असते. धर्मातील तत्वांचा वैचारिकतेतून जेव्हा विचार होतो तेव्हाच जीवनाला अर्थ प्राप्त होतो. जीवनात यशापयशाचे अनेक प्रसंग येतात. सुख पहाता जवाएवढे, मात्र दु:ख पर्वताएवढे, अशी स्थिती होते तेव्हा आत्मिक सुखप्राप्तीसाठी धर्मविचाराचे पालन करावे. आध्यात्मिकतेची भावना मनोमन ठेवून ईश्वरी चिंतनशील रहावे. उदात्त विचार मनी ठेवून सतत कार्यरत राहिल्यास यशस्वीतेचा महामेरू रोवता येतो.

विश्वात प्रत्येक ठिकाणी अदृश्य स्थितीत ईश्वराचे रूप असते. ईश्वरी उपासनेच्या माध्यमातून मानवाने आत्मिक सुख प्राप्त करून घेऊन जीवनात सत्यशीलतेचा मार्ग अवलंबावा. ईश्वर-उपासना करून स्वकर्तृत्वावर यश मिळविण्याचा प्रयत्न करावा. ते मिळविलेले यश चिरंतन असेल, यात तिळमात्र शंका नाही. ईश्वरावर पूर्णपणे विश्वास असेल आणि एखादे कार्य करण्याचे ठरविले तर त्या कार्यात यश येते. ईश्वरी-चिंतनाने आत्मिक विकास होऊन मनोमन धार्मिकतेचे मंदिर निर्माण होऊन सत्शील वृत्ती आकार घेते. धर्म-परंपरा आणि व्रतवैकल्याचे पूजक होऊन कार्यरत राहिल्यास तेथे अनैतिकतेला स्थान राहत नाही. परिणामी धर्म-परंपरेचे रूप नैतिकतेचे विश्व निर्मित करून मानवाला अपप्रवृत्तीपासून अलिप्त ठेवते.

धर्म मानवाला संस्कृतीची शिकवण देऊन मानवी जीवनाचे फलित समजाविते. धर्माचे, तत्वाचे पालन न करता कृती केली तर त्या कृतीत कोणताही अर्थ सामाविला जात नाही. अधर्म कृती विनाश करते. संस्कृती एक नाविन्यपूर्ण इतिहास घडविते. मग मानवाने धर्म-संस्कृतीचे अवश्य पालन करावे, धर्म, रूढी आणि परंपरेचे पूजन करून कृतीदक्ष रहावे. भावमय श्रद्धा मनात ठेवून तत्वप्रणालीचे पालन केल्यास मूर्तिमंत ईश्वराचे दर्शन घडले जाईल.

सत्प्रवृत्तीने मिळविलेला विजय म्हणजे यश, आणि अपप्रवृत्तीने गमाविलेले विचार म्हणजेच पराजय होय ! पराजयाच्या छायेत जीवन निरर्थक होते. त्यासाठीच प्रथमपासून मनात सत्प्रवृत्ती, सात्विक, पवित्र, मंगलमय भावना ठेवावी. या भावनेमुळे मांगल्यपूर्वकतेचे महत्त्व उमगते. नीतीमूल्यांचे मर्म समजावून घेऊन मानव वैचारिकतेच्या विश्वात भ्रमण करतो.

धर्मातून मानवाला जी शिकवण प्राप्त होते ती इतरत्र कुठेही प्राप्त होत नाही. सहिष्णुता ही धर्मापासून मानवाला मिळते. परोपकाराचे महान तत्त्व धर्म देत असतो. जीवन जगताना स्वत:च्या सुखासाठी दुसऱ्याचे सुख हिरावून घेऊ नका. तो एकप्रकारे अधर्म होय ! जीवन जगण्याची आशा ही प्रत्येकाला असते. म्हणजे दुसऱ्याचे सुख हिरावणे ही अपवित्रता होय !

धर्मपरंपरेत मानव व्यस्त झाल्यास जीवन-योग्यतेचे फल मानवाला मिळेल. धर्मपरंपरेची महती संतजनांनी मानवाला पटवून दिली. हिंदुधर्मपरंपरा वैश्विक, सारा मानव एक ही भावना प्रेरित करते. चैतन्य निर्माण करण्याचे महान कार्य संतांनी करून मानवाला आध्यात्मिक क्षेत्राची दिशा दिली. हे संतांचे अनमोल कार्य होय ! सत्यविचारांची साक्ष प्रत्यक्ष धर्मसंस्कृतीतून दिसते. धर्म आणि संतविचारांचे आचरण, तसेच संतांची अलौकिक शिकवण सहिष्णुता निर्मित करून तत्वमूल्यांचे भाव मनोमन रुजविते. धर्म-उपासनेने दिव्यत्वाची प्रचिती प्राप्त होते.

धर्म हा माया, वात्सल्य, प्रेमभावनांचे प्रतीक होय ! संतांच्या कार्याचे योगदान हे फार श्रेष्ठ होय !

मनुष्य जीवनात सुखाची अपेक्षा करतो. मात्र तो सुख मिळविण्यासाठी दुसऱ्याला दु:खी करतो. याला अधर्म म्हणतात. ईश्वरी-उपासना सात्विक भावाने आणि सन्मार्गी कृतीने करावी. मनुष्यजन्माचे सार्थक करून सज्जनांचा सहवास, तसेच निरामय मन:शांती हे जीवनाचे फलित होय !

---

(पृष्ठ क्र. ११ वरून)

**म्हणोनि तुज पडिला घाला ॥**
**अंत:काळी कोण सोडवी तुजला ॥**
**धरी श्री गुरूच्या चरणाला ॥**
**तरीच सार्थक होईल ॥६०॥**

**तू नेणसी संतसेवा ॥**
**चुका पडिला आत्मया देवा ॥**
**सद्गुरूचरणी रीघ करावा ॥**
**जन्मावेगळा होसील ॥६१॥**

**तुझे तुजला हे सुख पावे ॥**
**जेणे भेटे देवाधिदेव ॥**
**ऐसा न करिसी का उपाय ॥**
**सार्थकाचा ॥६२॥**

**आपण तरला नाही ॥**
**दुसऱ्यातें तारूं पाही ॥**
**लटकी देतो ग्वाही ॥**
**तरलो म्हणोनी ॥६३॥**

**ऐसीयाचे नि उपदेशे ॥**
**देव हा कसा दिसे ॥**
**लागला जन्ममरणाचा सोस ॥**
**कैसा चुके ॥६४॥**

**आंधळ्यासी आंधळा पंथ विचारी ॥**
**पंथ चालता दोघे पडले गारी ॥**
**त्यासी पाहिजे सूज्ञ शेजारी ॥**
**काढावयासी ॥६५॥**

---

(पृष्ठ क्र. १४ वरून)

वेदांचे अधिष्ठान असलेले आणि मनुधर्म शास्त्राप्रमाणे सर्वांना समान असणारे मूलभूत सद्गुणांचे विवेचन महाराजांनी सोप्या भाषेत केले आहे. हे सद्गुण फक्त एकाच धर्मासाठी नसून, जो जो म्हणून माणूस आहे - मग तो कोणत्याही धर्माचा, जातीचा किंवा पंथाचा असो - ज्याला निरामय जीवन जगून अंतिम ध्येय (परमेश्वरप्राप्ती) साध्य करावयाचे आहे त्या सर्वांनी जर हे सद्गुण अंगी बाणवले तर त्यांचे कल्याण होईल, हेच जगद्गुरूंना स्पष्टपणे व ठासून मांडावयाचे आहे.

सदर शाश्वत मूल्ये पायदळी तुडविल्यामुळे त्याचे दुष्परिणाम म्हणूनच की काय, सर्वत्र हिंसाचार, चोऱ्या, दरोडे, अत्याचार यांचा जणू डोंब उसळला आहे. आणि म्हणूनच अखिल विश्वातील मानवजातीला सुख, शांती, समाधानी व समृद्ध जीवन जगण्यासाठी आपण जगद्गुरूंनी विशद केलेल्या सद्गुण पंचपदीची प्राणपणाने जपणूक करावयास हवी.

संदर्भ - **'द बेसिक व्हर्च्युज'**
लेखक - **जगद्गुरू**
**श्री चंद्रशेखरेंद्र सरस्वती**
त्रैमासिक **'द व्हॉइस ऑफ शंकर'**च्या
सौजन्याने
अनुवाद - **श्री. म. पां. वाळिंबे**
सातारा.

---

# नाम-साधना

- श्री. कृष्णा तेली
कुडाळ, सिंधुदुर्ग.

कलियुगात साधनामार्गातील सर्वात सोपा-सुटसुटीत मार्ग म्हणजे 'नाम-साधना'. नाम हाच परमेश्वराचा मूर्त आविष्कार. नामापरते दुसरे तत्त्व या जगात नाही. अखंड नामसाधना करून कित्येक साधक सिद्धपदाला पोहोचले आहेत. सर्व संतांनी नामाची महती गायिली आहे. किंबहुना नामाशिवाय या जगात काहीच नाही. माणूस मनाच्या भराऱ्या मारीत राहतो. 'मन' ही एक चंचल व अस्थिर उपाधी माणसाला इथून-तिथून व्यापून उरली आहे. मनाचा आवेग व त्याचा परिणाम माणसाच्या दैनंदिन जीवनावर सतत घडतच राहातो-आपली इच्छा नसो वा असो !

या अशा मनाला लगाम घालणे तितकेसे सोपे काम नाही. मात्र त्याला आवर घालून त्याच्या स्वस्थतेसाठी उपाय करणे आवश्यक आहे. मनाचे नामात रूपांतर करणे जर जमेल तर हळूहळू मनाची गढूळता निवळेल. यासाठी नामाचे महत्त्व काय आहे ते समजले तर नामाची आवड नर्माण होईल असे वाटते. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी आपल्या प्रवचनांत नामाबद्दल एवढे सांगितले आहे की नामाशिवाय हे जग मिथ्या वाटेल. त्यांची प्रवचने नामाचे सार सांगतात. सामान्यजनांनी नाम कसे घ्यावे, कोणते घ्यावे, कधी घ्यावे, या उपासनेत पुढे जाणे कसे शक्य आहे, त्याची प्रचिती काय इत्यादी शंका दूर कराव्यात. म्हणजे मग नामाचा स्वच्छ प्रकाश पडेल.

**नाम म्हणजे काय** - कोणत्याही देवतेची उपासना करताना त्या देवतेचे नाव लयबद्ध शब्दात योग्यप्रकारे उच्चारवात घेत राहाणे यालाच नाम म्हणतात. कठीण अशा वस्तुवर एकाच प्रकारे अनेकदा घाव किंवा ठोके मारले तर ती वस्तु तुटेल, फुटेल, मऊ होईल; तद्वत नामाच्या सतत उच्चाराने देवाकडे जाणे, देवत्त्व पावणे जमू शकेल. ॐ नमः शिवाय। ॐ साईनाथाय नमः। ॐ दत्तात्रेयाय नमः। आदी नाम सतत घेणे आवश्यक आहे. एकच नाम घ्यावे, ते बदलत राहू नये. उपास्य देवता एकच असावी. तिथेच श्रद्धा ठेवावी. नाम घेण्यासाठी तुळशीच्या माळेचा उपयोग करतात. १०८ मण्यांची माळ असते. बहुतेक तीर्थक्षेत्रांत ती अल्प किंमतीला मिळते. आंघोळीनंतर आपण देवापुढे नमस्कार करतो त्यावेळी क्षणभर डोळे मिटतो - नेमकी हीच वेळ नामाला योग्य आहे. शक्यतो निर्विकार मनाच्या अवस्थेत घेतलेले नाम खोलवर रूजते, ते अधिक परिणामकारक ठरते. अशाप्रकारे नाम घेण्याची एकदा सवय जडली की रोज नाम घ्यावेसे वाटेल. मग नाम किती घ्यावे असे विचारण्यात येते. आपल्या दैनंदिन जीवनात कधीही, कुठेही, कितीही नाम घेत राहाता येते. त्याला निर्बंध नाहीत. परंतु अधिक शांतपणे व सवडीने एका बैठकीत नाम घेणे सुलभ ठरते. काही लोक नियमित १००१, १०८ किंवा अधिक वेळा नाम घेतात. कोणी नामसंख्या लिहूनही ठेवतात, वहीवर नाम लिहीतात, माळाही मोजतात. या सर्वांचा अर्थ एकच, नाम घेत राहाणे हे होय. 'मी नाम घेतो' अशी भावना कधीही शिवू नये हे पथ्य पाळावे. मी किती नाम घेतो हेही सांगणे टाळावे. मनाचे विकल्प दूर करायला जाताना ते आणखी घट्ट चिकटण्याची भीती असते. म्हणून नाम कसे घ्यावे याबद्दल पाहू या - नाम प्रथम उच्चारवाने घ्यावे. त्याची सवय झाल्यानंतर हळू आवाजात उच्चारावे. तद्नंतर ते ओठातच असावे, पुढे ते वैखरी (जिभेत) रूजावे व त्याहीपुढे ते कंठात साठवावे. हृदयस्थ - कंठातून आलेले - घेता येणारे नाम अधिक परिणामकारक ठरते. यावेळी आपण नाम घेत नसून आपणाकडून नाम उच्चारण्याची क्रिया होत आहे एवढे जमावे. नाम किती घ्यावे यासाठी उत्तर नाही. ते दृढ होईतो घ्यावे एवढेच म्हणता येईल. स्त्रियांनीसुद्धा नाम घेण्यास कोणतीही अडचण नाही. माणसाने कोणत्याही अवस्थेत असताना नाम घ्यावे. मनात आठवले की नाम घ्यावे. ते कोठेही, केव्हाही घ्यावे एवढे मनावर पक्के बिंबवावे. मनात असेल, नसेल याची पर्वा न करता 'नाम' घ्यावे ही अवस्था आली की नामाची गोडी वाढेल.

आता नामावर प्रेम वाटण्यासाठी नामाबद्दल संतवचने काय आहेत ती पाहू या. त्यायोगे 'नाम घ्यावे' असे वाटणे हीच फलप्राप्ती साध्य करून घ्यायची आहे.

(१) मनाला आवर घालण्याचे काम नामानेच होईल म्हणून नाम घ्यावे.

(२) मनाला नामाची संगती घडविल्यास जीवनाचे सोने होईल.

(३) उदास, आनंदी, खोडकर, विकारी, दुःखी, लोभी अशा सर्व अवस्थांमध्ये नामाची आठवण ठेवावी. मग त्याला उदास वाटणार नाही, आनंदाने हुरळून जाणार नाही, दुःखी मनःस्थितीतही तो स्वतःला सहज सावरेल, त्याच्याकडून लोभ घडणार नाही, तो कामांध होणार नाही, हे निश्चित !

(४) नामाने वाल्याकोळी तरला, तर आम्ही का नाही तरणार !

(५) नामाचा दृष्य फायदा हा की, मन शांत होते, वृत्ती स्थिर होतात, सर्वांचे भले व्हावे याचा सतत ध्यास लागतो, कुणाबद्दलही असूया, द्वेष याचा लवलेशही मनात ठरत नाही. मन गढूळ राहात नाही.

(६) नामाने खऱ्या प्रेमाची अनुभूती येते. प्रत्येक व्यक्तीत प्रेम विलसत आहे याची प्रचिती येते.

(७) नामाने मनुष्य हळवा बनतो, तसा तो कठीण प्रसंगी कठोरही बनतो. त्याला जीवन हा एक सहज प्रवास वाटतो. त्यात

(पृष्ठ क्र. १९ वर)

# बाबांच्या कृपावर्षावात छोटूभय्या

– सौ. उषा प्र. अधिकारी
बंदररोड, रत्नागिरी.

**बा**बांची अगदी जीवाभावाची अशी बरीच भक्तमंडळी होती. ज्याच्या-त्याच्या पात्रतेप्रमाणे कमीअधिक प्रमाणात बाबांचा सहवास त्यांना लाभे आणि प्रेमवर्षावही होई. या मंडळींत श्री. कृष्णराव परूळकर उर्फ छोटूभय्या हे बाबांच्या विशेष मर्जीतले गृहस्थ होते. त्यांची अत्यंत साधी राहाणी, प्रेमळ स्वभाव, सदाचारी वागणूक, सधन असूनही निगर्वीपणा आणि बाबांविषयी असलेली परमभक्ती याची बाबांना अंतर्ज्ञानाने पूर्ण जाणीव होती. त्यांची निष्ठा आपणावर किती प्रमाणात आहे, हे बाबा जाणत असल्यानेच हा लोभ त्यांच्यावर होता. छोटूभय्या, त्यांची पत्नी व इतर परिवारही बाबांची अनन्यभावे भक्ती करीत असत; आणि हे जाणून त्यांच्या संकटप्रसंगी बाबा जातीने धावून जात असत. एकदा शिवरात्रीचा दिवस होता. छोटूभय्यांचे कुटुंब, सुना, नातवंडे यांना नेमावरास श्री सिद्धनाथाच्या दर्शनासाठी जाण्याची इच्छा झाली. त्यांनी ती छोटूभय्यांना बोलूनही दाखवली. छोटूभय्यांना स्वत:ला जाणे शक्य नव्हते. ते म्हणाले,

''जायला हरकत नाही, पण एक लक्षात ठेवा, बाबांचे अखंड नामस्मरण चालू ठेवा ! तो आपला चालता-बोलता ईश्वर आहे.''

सर्वांनी हे आनंदाने मान्य केले. रविवारी दुपारी तीन वाजता सर्व मंडळी गाडीने रवाना झाली. सोमवार आणि त्या वारी शिवरात्र हा योग कुटुंबाला पर्वणी वाटत असल्याने आपण कधी एकदा पोचतोय असे त्यांना झाले होते, पण वाटेत गाडीचे चाक बिघडले. ते दुरुस्त होऊन निघेपर्यंत संध्याकाळही झाली. ही मंडळी नर्मदेच्या काठावर हडियास जेव्हा पोहोचली तेव्हा बघतात तो काय, नावा बंद झालेल्या. अंधार पडला की पाण्यात नावा घालण्यास बंदी होती. छोटूभय्यांचे नोकर नावाड्यांना म्हणाले,

''अहो, आम्ही दुप्पट पैसे देऊ, पण आम्हाला पैलतीराला न्या !''

नावाडी कबूल होईनात. आता काय करायचे ? या भयाण अंधारात जायचे तरी कोठे ? बरोबर छोटूभय्याही नाहीत. लहान मुलेही बरोबर आहेत. सगळी मंडळी हवालदील झाली. अत्यंत निराश अवस्थेत छोटूभय्यांचे कुटुंब बाबांचे नामस्मरण करीत म्हणाले,

''बाबा, तुमची मर्जी. असेल तसे होऊ दे ! पण जे काही होईल त्यात आमचेच हित असेल. तुम्ही काही आम्हाला टाकणार नाही.''

नंतर त्या नोकराकडे वळून म्हणाल्या,

''गाडी जोड ! हडियास कुठल्यातरी मंदिरात वस्ती करू.''

नोकर गाडी जोडायला जाणार, इतक्यात कमरेला फडके गुंडाळलेला, कफनी घातलेला, डोक्याला फडके बांधून पाठीवर सोगा सोडलेला एक फकीर पांढऱ्या रंगाची, ठेंगणी व धष्टपुष्ट घोडी घेऊन आला आणि नावाड्याला म्हणाला,

''अरे, आम्ही सगळा दिवस खूप त्रास सहन करून आलोय, आम्हाला पैलतीराला घेऊन चल !''

नावाड्याने त्यालाही नकार दिला. तेव्हा फकीर छोटूभय्यांच्या कुटुंबाजवळ येऊन म्हणाला,

''तुम्हालाही पलीकडे जायचं आहे ना ! इतका उशीर का केलात ? बरोबर बायकामुले आहेत. वेळेवर यायला हवे होते.''

त्यावर छोटूभय्यांचा नानू नावाचा नोकर म्हणाला,

''काय सांगणार तुम्हाला ? अगदी वेळेवर निघालो होतो, पण वाटेत गाडीचे चाकच बिघडले. दुरुस्त होऊन निघायला वेळ झाला.''

त्यावर फकीर म्हणाला,

''ही जागा कोणाच्या हद्दीत येते ?''

नानू म्हणाला,

''आपण उभे आहोत ती इंग्रजांच्या, आणि नर्मदेच्या पलीकडील होळकरांची आहे.''

त्यावर फकीर हसला आणि म्हणाला,

''थांबा, काळजी करू नका. मी आता ठाण्यावर जातो आणि लेखी हुकूम घेऊन येतो. तुम्ही बिनधास्त असा. त्यांच्या बापाला तुम्हाला घेऊन जायला लागेल.'' असे म्हणत फकीर गेला आणि दहा-बारा हातांवर जाऊन दिसेनासा झाला. इतका वेळ जे नावाडी पैलतीराला पोचवायला नाही म्हणत होते तेच मंडळीकडे आले आणि चला पलीकडे नेतो, असे म्हणू लागले. इतकेच नव्हे, तर त्यांनी स्वत:च सगळे सामान नेऊन नावेत ठेवले. मंडळी बसण्यापूर्वी छोटूभय्यांची पत्नी म्हणाली,

''पैसे किती द्यायचे ते आधीच सांगा ! पलीकडे गेल्यावर कटकट नको.''

त्यावर नावाडी म्हणाले,

''आम्ही काहीच सांगत नाही. तुम्हाला वाटेल तितके द्या ! नाहीतर मुळीच देऊ नका. लवकर बसा ! तुम्हाला सुखरूप पोहचवतो.''

नावाड्यांमध्ये हा विलक्षण बदल कशामुळे झाला हे मंडळींनी ओळखले. त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले आणि

छोटूभय्यांचे कुटुंब गहिवरल्या कंठाने म्हणाल्या,

''बाबा, आपण प्रत्यक्षच आमच्यासाठी धावून आलात आणि किती तसदी घेतलीत ! खरंच, आमचे बाबा पूर्ण अंतर्ज्ञानी, कृपाळू आहेत. संकटात सापडलेल्या भक्तांसाठी ते धाव घेतात आणि कशी, कुठे कळ दाबतात, समजत नाही, भक्तांचे लाड मात्र पूर्ण होतात.''

बाबांच्या कृपेमुळेच छोटूभय्यांची सर्व मंडळी पार नेमावरास गेली आणि त्यांच्या मनाप्रमाणे शिवरात्रीचा उत्सव पाहून सुखरूप घरी पोहचली.

छोटूभय्या सन १९१७ साली दरवर्षीप्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सवाला शिरडीला गेले होते. त्याचवेळी एका कारवारी गृहस्थाने बाबांचे अडीच बाय साडेतीन फूट रूंदीचे एक सुरेख चित्र काढले. ते पेन्सिलने काढले होते, पण अगदी हुबेहुब जमले होते. त्या गृहस्थाने ते चित्र काकासाहेब दीक्षित, काकासाहेब महाजनी व इतर भक्तांना दाखवले. त्यांना ते खूप आवडले. त्यांनी ते पांढऱ्या कापडात गुंडाळून द्वारकामाईत नेऊन ठेवले, कारण श्री बाबा आपला फोटो किंवा चित्र कोणालाही काढू देत नसत, आणि कुणी त्यांची आज्ञा न पाळता काढलेच तर ते उमटतही नसे, अशी त्याला शिक्षाही होई. त्यामुळे आपण हे स्केच बाबांना दाखवले तर ते नक्कीच संतापतील या भीतीने ते स्केच द्वारकामाईत ठेवले होते. त्या दिवशी दुपारी १२ च्या आरतीनंतर बाबा फार खुषीत आहेत असे पाहून श्री. माधवराव ऊर्फ शामा बाबांना म्हणाले,

''देवा, तुझ्या एका भक्ताने तुझा फोटो काढला आहे, तो बघशील काय ?''

हे ऐकल्यावर बाबा रागाने लालबुंद झाले आणि म्हणाले,

''कुठाय तो फोटो ? आण, आण माझ्यासमोर ! माझा फोटो काढता ! आण म्हणतो ना, आण इकडे !''

तेव्हा शामा व इतर भक्तांनी तो फोटो बाबांसमोर उभा केला. बाबांनी तो पाहून आपला सटका रागाने उचलून फोटोवर उगारला, पण दुसऱ्याच क्षणी ते शांत झाले आणि सटका खाली ठेवला. सर्व मंडळी अगदी गप्प राहून धडधडत्या अंत:करणाने हा प्रकार पहात होती. शामा मात्र धाडस करून म्हणाले,

''देवा, या फोटोचे काय करायचे ?''

बाबांनी चहुबाजूला पाहिले. त्यावेळी छोटूभय्या जवळच उभे होते. त्यांना खुणावून बाबांनी आपल्याजवळ बोलावले व प्रेमळपणाने म्हणाले,

''अरे, हा फोटो तू आपल्या घरी घेऊन जा ! तुझे कसे सगळे सोन्यासारखे होईल.''

छोटूभय्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. फोटो छातीशी घट्ट धरून त्यांनी डोळ्यांतील आनंदाश्रूंना मुक्त वाट करून दिली. इतर मंडळींनाही फार आनंद झाला, कारण निगर्वी, प्रेमळ, सात्त्विक छोटूभय्यांची तेवढी पात्रता होतीच.

सन १९१८ साली पुणेरी पोषाखात पुण्याचे एक ब्राह्मण गृहस्थ गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला आले. त्यांनी आपल्या उपरण्यातून दोन पादत्राणे आणली होती. बाबा रोज सकाळी लेंडीवर पायी जात असत. त्यावेळी त्यांनी ती पायात घालावी, हा त्या सद्गृहस्थांचा हेतु होता. त्याप्रमाणे बाबा लेंडीवर निघताच त्या गृहस्थांनी ती बाबांच्या समोर ठेवून त्यांना भक्तिभावाने नमस्कार केला. बाबांनी ती पादत्राणे पायात घातली, काही अंतर ते चालून गेले व नंतर ती काढून घेऊन ते अनवाणी पुढे गेले. तेथून परतताच भक्तांनी बाबांचे पाय धुतले आणि बाबा द्वारकामाईत शिरले. तेव्हा शामा म्हणाले,

''देवा, ह्या पादत्राणांचे काय करायचे ?''

बाबा हसून म्हणाले,

''अरे श्यामा, काय करायचे काय विचारतोस ? अरे, ती पादत्राणेही माझ्या छोटूभय्यालाच द्यायची. ये, घे ती पादत्राणे !''

आपल्यावरील बाबांची ही अनिवार कृपा पाहून छोटूभय्यांचे अष्टसात्त्विकभाव उचंबळून आले. डोळ्यांतून प्रेमाश्रूंचा पूर लोटला. आपल्या चालत्या-बोलत्या परमेश्वराचे हे चरणच आहेत, या भावनेने त्यांनी ती छातीशी घट्ट धरली. गहिवरल्या अंत:करणाने ते पुटपुटले,

''आज मी अगदी धन्य झालो ! ज्या माता-पित्यांनी मजवर अत्यंत चांगले संस्कार करून मला घडवले त्याचे चीज झाले आणि माझे जीवन कृतार्थ-कृतार्थ झाले.''

छोटूभय्यांना मिळालेला बाबांचा फोटो आणि त्यांचा चरणस्पर्श झालेली पादत्राणे त्यांचे सुपुत्र श्री. नारायण कृष्ण परूळकर यांच्या निवासस्थानी नित्य पूजेत आहेत. आपल्या थोर वडिलांचा वारसा चालवणारे श्री. नारायणराव हेही निष्ठावान साईभक्तच, हे काय सांगायला हवे !

---

(पृष्ठ क्र. १७ वरून)

बऱ्यावाईट घटनांचा त्याच्यावर कुठेही परिणाम दिसून येत नाही.

(८) नामामुळे मनाच्या अंधाऱ्या कोनाड्यात लख्ख प्रकाश पडतो, मी कोण आहे, हे विकल्परहित कळते.

(९) नामामुळे मनाची ताकद वाढते व ते मन अशक्य कामे शक्य करून दाखविते.

(१०) योग व नामसाधना करणाऱ्या साधकाला सतत जगाचे खरे स्वरूप समजते व तो निर्भय बनतो. ''मी कोणी नाही'' ही दृढ भावना झाल्यामुळे कोणतेही षड्रिपु त्याला छळू शकत नाहीत.

(११) दैनंदिन जीवनात श्वासोच्छवास जेवढा महत्त्वाचा आहे तेवढीच नामाची गरज आहे, हे लक्षात घ्यावे.

नामाचे सामर्थ्य काय आहे, हे नाम घेऊनच समजेल. ''प्रत्यक्ष अनुभव घेणे'' हाच त्याचा अर्थ आहे. श्रीखंड कसे असते, काय चव असते, असे कित्येकदा सांगूनही ते जसे चवीमुळे प्रत्यक्षात समजते, तद्वत नाम काय आहे, हे जिज्ञासूंनी प्रत्यक्षात अनुभवावे एवढीच नम्र विनंती. काहीही करा - नाम घ्या, नामाचे कवच तयार करा व निर्भय बना - एवढीच प्रार्थना !

---

# आशीर्वाद

– श्री. ह. ल. रानडे
सातारा.

''दवाखान्यात मला मुळीच जायचं नाही मोतीबिंदूचं ऑपरेशन करायला ! माझं ऑपरेशन झालं नाही व मला दिसलं नाही तरी चालेल. ऑपरेशन जर डॉक्टर आपल्या या घरी करणार असतील तरच मला ते करायचंय. दवाखान्यात जाऊन आता थोडक्यासाठी मी मुळीच बाटणार नाही. नाहीतरी मला आता सत्तरी आलीय, आणखी किती दिवस जगायचंय मला ? अन् तेव्हढे दिवस कमी दिसलं म्हणून बिघडलं कुठे ? आता काही कुठे बाहेरगावी जायचं नाही. घरातच राहिलेला काळ काढायचाय'', निर्मलाच्या सासूबाई आपल्या मुलाला म्हणत होत्या. ''पण अग आई ! ऑपरेशन घरी करत नाहीत. कारण ते घरी व्यवस्थित होत नाही. दवाखान्यात कशी त्यासाठी लागणारी सर्व साधनसामुग्री अगदी हाताशी तयार असते ! डॉक्टर घरी काय काय आणणार ? अन् आयत्या वेळेला आणखी काही लागलं तर केवढी धावाधाव ! शिवाय दवाखान्यात रहाण्याची वगैरे सर्व व्यवस्था चांगली असते. स्पेशल खोली घेतली म्हणजे तर काहीच अडचण नाही. दवाखान्यात डॉक्टरांना लक्ष ठेवणेही सोयीचे होते. तू अर्थात तेथे काही खाऊ-पिऊ नकोस म्हणजे झालं. तुला निर्मला जेवण व चहा घेऊन येत जाईल व रात्री झोपायलाही ती थांबेल. येऊन-जाऊन फारतर प्रश्न ३/४ दिवसांचा. आता तुझं जे सोवळं-ओवळं आहे ना ते तेव्हढं चार दिवस बाजूला ठेव, म्हणजे झालं. तेव्हा तू माझं आपलं ऐक, अन् हे घरी ऑपरेशन करण्याचं तुझ्या डोक्यातून काढून टाक. म्हणजे सर्वांचाच त्रास वाचेल,'' श्रीनिवासराव आईला म्हणाले.

पण श्रीनिवासरावांची आई मुळीच ऐकायला तयार नव्हती. तेव्हा निर्मलाने खुणेने श्रीनिवासरावांना आपल्याकडे बोलावून घेतले व ती त्यांना म्हणाली, ''अहो, सासूबाई पुन्हा पुन्हा हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करायचं नाही म्हणताहेत ना ! मग कशाला उगीच थोडक्यासाठी त्यांना पुन: पुन: तेच तेच सांगून दुखवता ! अहो ! जन्मभर त्यांनी सोवळं-ओवळं पाळलं, अन् मीसुद्धा त्यांना ते पाळायला मदत केली, मग आता थोड्या दिवसांसाठी त्यांच्यावर कशाला जबरदस्ती करता ? अहो ! जन्मोजन्मीचे संस्कार आता म्हातारपणी एकदम कसे जातील ? तेव्हा माझं म्हणणं असं की तुम्ही डॉक्टरांकडे जाऊन त्यांना सासूबाई म्हणतात त्याप्रमाणे ऑपरेशन आपल्या घरी करण्याची विनंती करा. आईचं सोवळं-ओवळं आपल्या फॅमिली डॉक्टरांना चांगलच ठाऊक आहे आणि आपले फॅमिली डॉक्टर फारच सज्जन आहेत. ते नाही म्हणणार नाहीत, अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे.'' श्रीनिवासराव त्यावर म्हणाले, ''अग ! तू म्हणतेस ते खरं आहे. आईचं सोवळं-ओवळं, वय वगैरे गोष्टी लक्षात घेऊन डॉक्टर ऑपरेशनसाठी आपल्या घरी येतीलही. पण आपण त्यांना घरी बोलावून अडचणीत का टाकायचं ? अग ! दवाखान्यात सर्व साधनसामुग्री अगदी हाताशी असल्यामुळे डॉक्टरांना तेथे ऑपरेशन करणे खूपच सोपे जाईल, अन् त्यामुळे ते नक्की चांगले व यशस्वीपण होईल. घरी ऑपरेशन केलं की विनाकारण आपल्यावरच जास्त जबाबदारी व डॉक्टरांना सर्व साहित्य, नर्सेस वगैरे येथे आणण्याचा त्रास. शिवाय तू मला सांग, ऑपरेशननंतर आईची शुश्रूषा घरी कोण करणार ? अग, ऑपरेशननंतर डोळे बांधून ठेवल्यामुळे तिला दोन-तीन दिवस तरी अंथरूणावर रहावे लागेल ना ! त्या दिवसांत जेवण भरवावे लागेल, अन् विधीची भांडीही वेळोवेळी देऊन ती साफही करावी लागतील. हॉस्पिटलमध्ये तेथील नोकर-चाकर या गोष्टी करतात. शिवाय तेथे सिस्टर्स असल्यामुळे आपण सारखे हजर रहाण्याचीही जरूरी नाही. तेव्हा मला वाटतं, ऑपरेशन दवाखान्यात करण्यासाठी तू आईचे मन वळव. तू जर पटवून दिलंस तर आई तुझे ऐकेल, असे मला वाटते.''

पण सासूबाई मुळीच ऐकणार नाहीत, हे निर्मलाबाईंना ठाऊक असल्यामुळे व सासूबाईंचे मन मोडणे त्यांना शक्य नसल्यामुळे त्या आपल्या पतीला पुन्हा म्हणाल्या, ''पण सासूबाई माझे वाटेल ते ऐकणार नाहीत, असं मला वाटतं व मीपण त्यांना याबाबतीत मुळीच गळ घालणार नाही ! अहो, एवढे दिवस मी त्यांना मुळीच न दुखवता त्यांच्या मनाप्रमाणे सर्व करत आले. त्रास होत होता तरी त्यांचे सोवळे-ओवळे जपले, अन् आता थोडक्यासाठी त्यांचे मन मोडणे मला मुळीच जमायचे नाही. तेव्हा तुम्ही माझं ऐका. आपण त्यांच्या इच्छेप्रमाणे डॉक्टरांकडून त्यांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन घरीच करून घेऊ. त्यांची सर्व सेवा मी करीन. तुम्ही त्याबाबत मुळीच काळजी करू नका. नाहीतरी दवाखान्यात नेल्यावर दोनदा चहा नेणे, दोनदा जेवण नेणे, झोपायला जाणे हे बऱ्याच वेळा मलाच करावं लागणार. दवाखान्यातसुद्धा त्यांना चहा पाजणे, जेवण भरवणे हे काम मलाच करावं लागणार. हे काम सिस्टर्स थोडयाच करणार आहेत ? मग राहिलं काम कोणतं ? वेळोवेळी पॉटस् देण्याचंच ना ! तेसुद्धा मी करीन, अगदी आनंदानं, मुळीच तक्रार न करता ! मग तर झालं ना ! माझ्या मते घरीच ऑपरेशन करून पुढील शुश्रूषा दवाखान्यापेक्षा घरी करणंच मला जास्त सोयीचे होईल, अन् त्यामुळे दवाखान्यात हेलपाटे घालण्याचे माझे काम वाचेल; अन् खरं सांगू का, सासूबाईंचा माझ्यावर फार विश्वास आहे. त्यांना दवाखान्यात सिस्टर्सकडून सेवा करून घेणं मुळीच आवडणार नाही. त्याचा त्यांच्या मनावरही परिणाम होईल. त्यांना घरी माझ्याकडून शुश्रूषा करून घ्यायला मुळीच संकोच वाटणार नाही, अन् त्या शुश्रूषेमुळे माझ्या मते त्या लवकर बऱ्यापण होतील. शिवाय

ऑपरेशन घरी यशस्वी होईल किंवा नाही याबाबत तुमच्या मनात शंकासुद्धा आणू नका. आपण परमेश्वराची उपासना करतो ना, मग ऑपरेशन चांगले होईल की नाही याची फिकीर आपण कशाला करायची ? त्याची फिकीर तो भगवंत करील. सासूबाईंचे ऑपरेशन घरीही चांगले यशस्वी होईल याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. यावेळी माझ्या वडिलांनी माझ्याकडून लहानपणी पाठ करून घेतलेला गीतेतील श्लोक मला आठवतो, ''यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥'' भगवंत जेथे आहे तेथे यश ठेवलेलेच आहे. अहो, तुमची आई तर माझ्यापेक्षा कितीतरी देवभक्ती करते. काम करत असतानासुद्धा त्यांच्या तोंडात सतत देवाचं नाव असतं. तेव्हा तुम्ही नि:शंक होऊन डॉक्टरांकडे जाऊन घरीच सासूबाईंचं ऑपरेशन करण्याची तारीख ठरवून या.''

निर्मलाची सासू आपल्या मुलाचा व त्याच्या बायकोचा संवाद ऐकत होती. तो ऐकून तिचे डोळे पाण्याने भरून आले. त्या चट्कन आपल्या जागेवरून उठल्या आणि निर्मला व श्रीनिवासराव ज्या खोलीत बसले होते त्या खोलीत जाऊन निर्मलाच्या पाठीवर थाप मारून म्हणाल्या, ''निर्मला, धन्य आहे तुझी ! मला वाटतं की तू खरोखरीच या घरातील देवताच आहेस. सोन्याच्या पावलांनी या घरात येऊन सोन्यासारखीच वागतेस. श्रीनिवास नको म्हणतोय तरी तू स्वत: कष्ट सोसून केवळ मला नको म्हणून माझ्यासाठीच माझे ऑपरेशन घरी करावयास त्याला तयार केलंस. म्हणजे केवढ्या मोठ्या मनाची आहेस तू ! चार-दोन दिवस माझी घाण काढायलाही तू तयार आहेस ! कमाल आहे तुझी ! अग, माझ्या मुलीसुद्धा एखाद वेळेस हे काम करायला तयार होणार नाहीत, अन् तू माझी सून असून हे काम अंगावर घेतेस व तुझ्या आईप्रमाणे मला मानतेस.'' ''परमेश्वरा, मागच्या जन्मी मी काय पुण्य केलंय म्हणून तू मला एवढी चांगली सून दिलीस !''

''पण निर्मला, या तुझ्या जगावेगळं वागण्याचं इंगित समजून घेण्याची मला फार इच्छा आहे. तुला मी इतके दिवस विचारीन विचारीन म्हणतेय, पण आज ते विचारते. तू मला हे सांग, हे असं देवासारखं चांगलं वागायला, काम अंगावर घ्यायला, सर्व अपमान गिळायला तुला कोणी शिकवलं ? शिवाय काम पडतं म्हणून तू कधी दुर्मुखलेली, रागावलेली दिसत नाहीस. तुझा चेहरा पहावा तेव्हा सदा आनंदी, हसतमुख व प्रसन्नच असतो. मी पुष्कळ ठिकाणी पहाते की सुनांना सासवा अगदी नकोशा असतात. त्या त्यांचा दुस्वास करतात व केव्हा एकदा मियाबिबीचं स्वतंत्र बिऱ्हाड होतंय असं त्यांना होऊन जातं. पण तुझं पहावं तर उलटंच ! गेले कितीतरी महिने मी तुझ्याकडे रहातेय. जेव्हा माझ्या दुसऱ्या मुलाकडे जायचा विषय मी काढते तेव्हासुद्धा तू तो उडवून लावतेस व इथंच राहिले पाहिजे म्हणून आग्रहाने ठेवून घेतेस, याला काय म्हणावं, हेच मला कळत नाही. तुला सासूचा कंटाळा कसा येत नाही ? तू माझ्याशी इतक्या प्रेमाने, आपलेपणानं व समजूतदारपणाने वागतेस की माझासुद्धा या घरातून पायच निघत नाही. तुझं घर म्हणजे खरोखरी देवघर आहे ! देवघर ! शांत, प्रसन्न नि पवित्र ! अन् तुझा तो गोकुळातल्या श्रीकृष्णासारखा दिसणारा आनंद ! तोही गुलाम अगदी तुझ्यासारखाच व त्याच्या नावासारखाच, आनंदी व गोड, शिवाय प्रेमळ नि लाघट ! तुझे अगदी पांग फेडील असं वाटतं मला !'' त्यावर निर्मला म्हणाली, ''होय सासूबाई, तुमच्या आशीर्वादाने तोही उत्तम निघेल, असं मला वाटतं. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात ना त्याप्रमाणे तो लहानपणापासूनच कसा छान वागतोय. मुख्य म्हणजे त्याचा अजिबात हट्ट नाही. आम्ही काय सांगू ते तो ऐकतो. अभ्यासातही त्याची प्रगती छान आहे. परवाच त्याचे गुरूजी ह्यांना भेटले होते व ते म्हणत होते की तुमचा आनंद म्हणजे लाख मुलगा आहे. तो पुढे खूप मोठा होईल.'' हे ऐकून सासूबाई म्हणाल्या, ''मलापण आनंदच्या गुरूजींप्रमाणेच वाटतं बघ ! तुझा आनंद अगदी हिरा निघेल बघ हिरा ! या म्हातारीचा आशीर्वाद खरा होतो की नाही बघशीलच तू ! अग, या साऱ्या बोलण्यामध्ये माझ्या प्रश्नाचं उत्तर राहिलंच की ! तेव्हा तू ते एकदा देऊन टाक बघू !''

निर्मला सासूबाईंना म्हणाली, ''तुम्ही फारच स्तुती करता. त्यामुळे मला अगदी ओशाळल्यासारखं होतं. अहो ! माणसाने माणसाशी असंच माणसासारखं वागायचं असतं. आता मी हे कोठून शिकले हे तुम्ही मला पुन्हा पुन्हा विचारता म्हणून ते मी तुमचे ऑपरेशन झाल्यावर सांगेन.''

निर्मलाच्या इच्छेप्रमाणे भागिरथीबाईंचे मोतीबिंदूचे ऑपरेशन घरीच व्यवस्थित पार पडले. त्यानंतर घ्यावयाची काळजी व सासूबाईंची सर्व शुश्रूषा निर्मलाने अगदी मनापासून कधीही न कुरकुरता केली. श्रीनिवासरावांना त्याबद्दल नवल वाटले व त्यांनीही त्याबाबत आपल्या पत्नीस शाबासकी दिली. भागिरथीबाईंना तर वेळोवेळी खूप धन्यता वाटत होती व ती कृतज्ञता त्या वेळोवेळी बोलूनही दाखवत होत्या. शिवाय भगवंताजवळ ह्या सर्वांना चांगली बरकत येऊ दे म्हणून प्रार्थनाही करीत होत्या. काही दिवसांनी डॉक्टरांनी भागिरथीबाईंच्या डोळ्यावरील पट्टी सोडली. पण डोळे दिपत असल्यामुळे त्यांना काळा चष्मा देऊन हळूहळू हिंडावयास परवानगीपण दिली.

मुलगा नको म्हणत असताना एवढे कष्ट व जबाबदारी अंगावर घेऊन निर्मलाने आपले मोतीबिंदूचे ऑपरेशन घरी करवले व ते व्यवस्थित होऊन आपणास दिसू लागले म्हणून भागिरथीबाईंना मनस्वी आनंद झाला. चार-सहा दिवसांनी एक दिवस निर्मलाला बोलावून त्या म्हणाल्या, ''तू गेले काही दिवस माझ्यासाठी अपार कष्ट घेतले आहेस. एरवीही तू मला फुलासारखी जपत असतेस, मला काही कमी पडू देत नाहीस. तुझ्याबद्दल मला काय वाटतं हे मी शब्दांनी सांगू शकत नाही. तेव्हा माझी एक इच्छा आहे, तुझ्या सासऱ्याने माझ्या नावावर जे काय ठेवले आहे ते सर्व मी तुझ्या आनंदला बक्षीस द्यावं असं म्हणते. बाकीच्या माझ्या दोन्ही मुलांना त्यातलं काही देण्याची माझी इच्छा नाही. कारण त्यांनी माझ्यासाठी काहीच केलेलं नाही.'' निर्मला ताबडतोब म्हणाली, ''सासूबाई, तुम्ही असं मुळीच करू नका. जे काय तुमच्याजवळ आहे त्याच्या तीन सारख्या वाटण्या करा. कारण मी तुमचं जास्तीचं काहीच केलेलं नाही. माझं कर्तव्य फक्त मी

बजावलं. कर्तव्याला कसली बक्षिसी ? तेव्हा तुम्ही सगळं माझ्या आनंदला देऊ नका. तसं तुम्ही केलत तर बाकीच्यांना ते आवडणार नाही. तेव्हा तुम्ही सर्वांना सारखं काय द्यायचं ते द्या.'' भागिरथीबाई म्हणाल्या, ''मग तुला व आनंदला मी जास्तीचं काय देऊ ?'' ''तुमचे लाखमोलाचे आशीर्वाद. ते त्याला व मला जन्मभर पुरतील'', निर्मलाने ताबडतोब उत्तर दिले.

आपण आपली सर्व इस्टेट अगदी स्वखुशीने आनंदच्या नावे करून देत असतानासुद्धा निर्मला त्याबाबत मुळीच लोभ न ठेवता नको म्हणते हे पाहून भागिरथीबाईंना तिच्या निर्लोभी व निस्पृहपणाचीही कल्पना आल्यामुळे त्यांना आपल्या सुनेच्या खऱ्या मोठेपणाची आणखीनच जाणीव झाली. आणि त्यामुळे तिच्या या सर्व कमालीच्या आदर्श वागणुकीचे रहस्य आजच समजावून घेण्याचे त्यांनी ठरवले; व निर्मलालाही त्या दिवशीच ते सर्व सांगावे लागले.

निर्मला म्हणाली, ''तुम्ही आता खनपटीलाच बसला आहात म्हणून मी सर्व सांगते. हा आदर्श वागणुकीचा वारसा पुष्कळसा माझ्या वडिलांचा व थोडाफार आईचा. माझे वडील होते खूप धार्मिक वृत्तीचे ! घरात सतत काही ना काही धार्मिक कृत्य चालू असे. कधी सत्यनारायणाची पूजा, तर कधी लघुरूद्र, तर कधी गणपतीला अभिषेक, तर कधी मंत्रजागर, अगर काहीतरी निमित्ताने ब्राह्मणभोजन. त्यामुळे आमच्या घरातील वातावरण सदैव शुद्ध, शांत व पवित्र असे. शांतताभंग झालेला वडिलांना मुळीच आवडायचा नाही. वडिलांना संस्कृतची फार आवड. त्यामुळे त्यांनी आमच्याकडून लहानपणीच काही चांगली संस्कृत सुभाषिते, स्तोत्रे, मनाचे श्लोक पाठ करून घेतले. गीता हा तर वडिलांचा अतिशय आवडीचा ग्रंथ. त्यातील कमीतकमी एक अध्याय तरी ते रोज वाचत असत. त्यांनी गीतेतील काही सोपे व महत्त्वाचे श्लोक आमच्याकडून पाठ करून घेतले होते. ते आम्हाला नेहमी सांगत की तुम्ही पुढे गीतेचा चांगला अभ्यास करा व गीतेत सांगितल्याप्रमाणे वागायला शिका. गीतेत श्रीकृष्णप्रभूंनी सांगितल्याप्रमाणे माणसे जर वागू लागली तर त्यांना आदर्श जीवन कोणते व ते कसे जगावे हे समजेल. कोणत्याही संकटाला ते न भिता सामोरे जाऊ शकतील. जगातही त्यामुळे सर्व ठिकाणी सुख, समाधान, शांती, समृद्धी व तृप्ती नांदू लागेल, अन् त्यामुळे सर्वत्र आनंदाचे साम्राज्यच नांदू लागेल. पुढे आम्हाला जसजसे कळू लागले तसतसे त्यातील काही सोप्या सोप्या श्लोकांचा अर्थही ते आम्हास समजावून देऊ लागले. वडील सांगत, गीता सांगून श्रीकृष्णप्रभूंनी अर्जुनाला कामाला लावले. त्याला सांगितले की तू सतत कामामध्ये मग्न रहा. कामाचा कधीच कंटाळा करू नकोस. काम कधी टाळूही नकोस व कामाबद्दल कुरकुरपण करू नकोस. शिवाय जे काम करशील त्यातून आपणास काही मिळेल याची अपेक्षासुद्धा करू नकोस. शिवाय परमेश्वर सर्वज्ञ, सर्वव्यापी व सर्वसाक्षी असल्यामुळे तो आपले सर्व व्यवहार पहात असतो. शिवाय सर्व कामे परमेश्वरालाच अर्पण करावयाची असल्यामुळे ती चांगली व्हायला हवीतच. नाहीतर परमेश्वरास ती आवडणार नाहीत. काम हाच गुरू असल्यामुळे सतत काम करणाऱ्या माणसाची प्रगती होत राहते. शिवाय जे काम करावयाचे ते भगवंताच्या स्मरणात केले म्हणजे तो सतत आपल्या जवळ असतो व मग कशाचीही फिकीर किंवा भीति रहात नाही. भगवंताचे सान्निध्य ज्याला लाभले तो खरोखरीच भाग्यवान होय. अशा माणसाला कधी अपयश येत नाही, आणि त्याच्याजवळ सतत समृद्धी, ऐश्वर्य नांदत असते. या गीतेमधील शिकवणुकीचा माझ्यावर खूपच चांगला परिणाम झाला व त्यामुळे आदर्श व उत्तम जीवन कोणते ? व ते कशाप्रकारे जगावयाचे हे मला कळू लागले.

पण गीतेपेक्षा माझे लग्न ठरल्यानंतर माझ्या वडिलांनी मला सासरी कसे वागावयाचे ह्याबाबत जे व्यावहारिक मार्गदर्शन केले त्याचा मला खूप उपयोग झाला व त्या उपदेशाप्रमाणे मी सासरी आल्यावर वागायचे मनोमन ठरविले. वडील म्हणाले, ''शकुंतला (निर्मलाचे माहेरचे नाव), तू आता लवकरच सासरी जाणार ! म्हणून तुझे आता 'सासरीकरण' झाले पाहिजे. सासरीकरण म्हणजे सासरी गेल्यावर तू तुझे स्वतंत्र अस्तित्व ठेवू नकोस. सासरच्या मंडळींच्या प्रवाहात सामील हो व त्यात विलीन हो. त्यामुळे तू सुखी होशील व सासरच्या माणसांनाही सुखी करशील. आता आमच्याकडील माणसे तुझी नव्हेत. आता सासरची माणसे तुझी माणसे. सासरी गेल्यानंतर तू तुझी इच्छा पतीच्या इच्छेत मिळवून टाक. त्यांचे मन कधीच मोडू नकोस. ते तुझ्यावर रागवले तरी तू त्यांच्यावर रागवू नकोस. सासरच्या सर्व वडिलधाऱ्या माणसांची आनंदाने सेवा कर. त्यांच्या मनाप्रमाणे वाग. तुझ्या नवऱ्याला जरी दोन भाऊ असले तरी सासूबाई आपल्याजवळच रहाव्यात अशीच इच्छा मनात ठेव आणि त्यांच्याशी अत्यंत प्रेमाने व आदराने वाग. वडिलधारी माणसे आपल्याजवळ नेहमी असली म्हणजे आपल्याला त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळतो व मुलांना चांगले वळणपण लागते. आपल्याला त्यांची सेवा करण्याचीही संधी मिळते. त्यामुळे त्यांच्याकडून आपल्याला भरपूर आशीर्वाद मिळतात. असे आशीर्वाद मिळविणे हीच जीवनातील सर्वोत्कृष्ट कमाई आहे. पैशापेक्षा हे लाखमोलाचे आशीर्वाद आपल्या जीवनात फार मोठी कामे करून जातात.''

वडिलांनी केलेला हा उपदेश मी अगदी माझ्या हृदयामध्ये कोरून ठेवला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी तुमच्या घरी आल्यावर वागायचं ठरवलं. त्याचा मला खूप फायदा झाला. तुम्ही माझ्याजवळ असल्यामुळे मला तुमची थोडीफार सेवा करता आली आणि तुमचे आशीर्वाद व सदिच्छा जमा करता आल्या. त्याचे फलित म्हणूनच माझा आनंद एक उत्तम मुलगा निघून आमची परंपरा चांगलीच पुढे चालवील याची मला खात्री वाटते.''

निर्मलेला वाटत असलेली ही खात्री अगदी खरी ठरली. आनंद व त्याची बायको आता निर्मलेवर सुखाची कारंजी उडवीत आहेत. सासूबाईंची आपण केलेली निरलस व निस्पृह सेवा आणि त्यावेळी त्यांनी मनोमन व्यक्त केलेल्या सदिच्छा व दिलेले आशीर्वाद यांचेच हे फलित होय, असेच निर्मला सर्वांना सांगत असते.

---